# अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर
## मा.स्थायी समिती सभा क्रमांक : ०९

**विषय क्रमांक : ९३** **दिनांक :- २७/०९/२०२२**

---

**प्रस्तावाचा विषय :-** अहमदनगर महानगरपालिका कै.बाळासाहेब देशपांडे दवाखाना अत्यावश्यक सेवेसाठी करारानुसार तात्पुरत्या स्वरूपात १. शितल गंगाराम शिंदे२.तृप्ती रावसाहेब बडे यांची परिचारीका यापदी तांत्रिक खंड देवून अटी व शर्ती प्रमाणे पुढील सहा महिन्याकरीता मानधनावर करारबध्द पुर्ननियुक्ती करणे बाबत ऑफिस रिपोर्ट.

**प्रस्तावाचा मजकुर:-** अहमदनगर महानगरपालिका आस्थापना विभाग

उपरोक्त विषयान्वये प्रस्ताव सादर करण्यात येतो की, कै. बाळासाहेब देशपांडे दवाखाना यांनी त्यांचेकडील जा. क्र. कै. बाळासाहेब देशपांडे दवाखाना ५८५ दि. ०३/०७/२०२२ अन्वये प्रस्ताव सादर करून त्यामध्ये "कै. बाळासाहेब देशपांडे दवाखान्याकरीता करारानुसार तात्पुरत्या स्वरुपात परिचारीका यापदी १) शितल गंगाराम शिंदे २) तृप्ती रावसाहेब बडे यांचा अटी व शर्तीनुसार मानधनावरील पुर्ननियुक्तीचा कालावधी दि. ०३/०१/२०२२ पासून सहा महिन्यांकरिता असुन सदरची मुदत ही दि. २९/०७/२०२२ रोजी पासुन समाप्त झालेली असल्याने त्यांना तांत्रिक खंड देवुन दि. ०२/०८/२०२२ पासुन पुढील सहा महिन्याकरीता मानधनावर पुर्ननियुक्ती करणेबाबत." सुचित केलेले आहे.

कै. बाळासाहेब देशपांडे दवाखाना यांचेकडील जा.क्र.कै.बा.दे.दवा. ९३५ दिनांक १४/०३/२०२२ अन्वयेच्या प्रस्तावानुसार सद्यस्थितीमध्ये मा. स्थायी समिती ठराव क्रं. ४५ दि. २४/०६/२०२२ अन्वयेच्या पुर्व मान्यता पारीत ठरावाच्या अनुषंगाने जा.क्र.आस्था.करारबध्द नेमणुक २६२४ दि. १४/०७/२०२२ अन्वये कै. बाळासाहेब देशपांडे दवाखान्या करीता करारानुसार तात्पुरत्या स्वरुपात परिचारीका यापदी १) शितल गंगाराम शिंदे २) तृप्ती रावसाहेब बडे यांची रु. १४,३००/- या दरमहा मानधनावर अटी व शर्ती प्रमाणे तांत्रिक खंड देवून दि. ३०/०१/२०२२ पासुन सहा महिन्याकरीता करारबध्द पुर्ननियुक्ती करण्यात आलेली असुन सदरची मुदत ही दि. २९/०७/२०२२ रोजी पासुन समाप्त झालेली आहे.

तरी वरील संदर्भिय अहवालाच्या अनुषंगाने व महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ मधील ५३ च्या तरतुदीनुसार कै. बाळासाहेब देशपांडे दवाखान्याकरीता अत्यावश्यक सेवेसाठी करारानुसार तात्पुरत्या स्वरुपात परिचारीका यापदी १) शितल गंगाराम शिंदे २) तृप्ती रावसाहेब बडे यांना तांत्रिक खंड देवुन दिनांक ०२/०८/२०२२ पासुन पुढील सहा महिन्याकरीता अटी व शर्ती प्रमाणे रुपये १४,३००/- या दरमहा मानधनावर करारबध्द पुर्ननियुक्ती करणे बाबतच्या प्रस्तावास मा. स्थायी समितीची पुर्व मंजुरी मिळणे कामी निर्णयासाठी सादर करणे करीता मा. मुख्य लेखाधिकारी व मा. मुख्य लेखापरिक्षक यांचा अभिप्राय घेवुन सदरचा प्रस्ताव मा. स्थायी समितीकडे पाठविणेस मंजुरीस्तव आदेशार्थ सादर.

येणे प्रमाणे लिपिक टंकलेखक यांचा अहवाल असे.

यावर मुख्य लिपिक यांची स्वाक्षरी.

यावर मा.सहा.आयुक्त (आस्थापना ) यांचा अभिप्राय की,प्रस्तावित "अ" नुसार मा.स्थायी समितीकडे निर्णयास्तव पाठविणे उचीत होईल.तथापी आदेशार्थ सादर.

मा.मुख्यलेखाधिकारी यांचा अभिप्राय की,वेळेत प्रस्ताव सादर करणे आवश्यक आहे.प्रस्तावित प्रकरणी आदेशार्थ सादर.

यावर मा.उपायुक्त (सा) यांचा अभिप्राय की,मा.मुख्यलेखापरिक्षक "अभिप्राय"

यावर अंतर्गत लेखापरिक्षक यांचा अभिप्राय की,मा.शासन सामान्य प्रशासन विभाग शासन परिपत्रक क्र.एस.आार.व्ही.२००५ /प्र.क्र.४७/०५/१२ दि.२५ /८/ २००५ मधील परिच्छेद क्र.५मध्ये "सर्व पदावरील नियुत्या विहीत मार्गाने / माध्यमामार्फत करण्याची दक्षता घ्यावी,अत्यंत तातडीची गरज म्हणून तात्पुरत्या

अस्थायी नियुक्त्या कराव्या लागल्यातर त्या विहीत वेळेत संपुष्टात आणण्याची दक्षता घ्यावी असे नमुद केले आहे.

प्रस्तावित परिचारीका या पदी तांत्रीक खंड पुढील मुदतवाढ देताना उपरोक्त शासन परिपत्रकाचे अवलोकन करून उचित कार्यवाही करण्यात यावी.

यावर मा.उपायुक्त (सा) यांचा अभिप्राय की,संबंधीत विभागाने अहवाल ,मुलेअ व मुलेप यांचे अभिप्रायानुसार पुढील कार्यवाहीसाठी मा.स्थायी समितीसमोर निर्णयासाठी ठेवण्यास आदेशार्थ सादर.

यावर मा.अति.आयुक्त साहेब यांचा अभिप्राय की,प्रस्तावित केल्यानुसार निर्णयास्तव मा.स्थायी समिती कडे पाठविण्यास मान्यतेस्तव सादर.

यावर मा.आयुक्त साहेब यांचा अभिप्राय की,यथाप्रस्तावित मान्य.

सबब प्रकरण मा.स्थायी समिती सभेपुढे सादर.

--**--

**चर्चा :-**

मा.सभापती साहेब :- अहमदनगर महानगरपालिका कै.बाळासाहेब देशपांडे दवाखाना अत्यावश्यक सेवेसाठी करारानुसार तात्पुरत्या स्वरूपात १. शितल गंगाराम शिंदे२.तृप्ती रावसाहेब बडे यांची परिचारीका यापदी तांत्रिक खंड देवून अटी व शर्ती प्रमाणे पुढील सहा महिन्याकरीता मानधनावर करारबध्द पुर्ननियुक्ती करणे बाबत ऑफिस रिपोर्ट बाबतची माहिती देण्यात यावी.

वैदयकीय आरोग्य अधिकारी डॉ.राजुरकर :- महानगरपालिकेच्या कै.बाळासाहेब दवाखाना येथे येणा-या गरजु महिला रूग्णांना प्रसुतिपुर्व सेवा व प्रसुतीपश्चात अशा स्वरूपात रूग्ण सेवा दिल्या जातात.दवाखान्यामध्ये सध्या कर्मचा-यांची आवश्यकता आहे.बाळासाहेब देशपांडे दवाखाना येथे आर.सी.एच.मार्फत आउटसोर्सीग मार्फत मनपा फंडातून कर्मचारी घेतले आहेत.सदर विषयमाध्ये दोन परिचारीका यांना मुदतवाढ देणे आहे.त्यांचे काम चांगल्या प्रकारे असून त्यांना मुदतवाढ देण्यास हरकत नाही.

मा.सभापती साहेब :- नागापुर परिसरामध्ये मोकाट कुत्र्याच्या हल्यामध्ये एका बालकाचा मृत्यु झालेला आहे.अशा घटनायापुर्वी अनेक वेळा घडलेल्या आहे.महानगरपालिकेमार्फत कोणतीही ठोस कार्यवाही करण्यात येत नाही.कुत्र्याच्या हल्यामध्ये मृत्यु पावलेल्या शिवराज ससाणे या बालकाच्या नातेवाईकांनी नुकसान भरपाई मिळावी या बाबत महानगरपालिकेकडे अर्ज दिलेला आहे.त्यावर काही कार्यवाही झालेली नाही.सदर विषयाबाबत माहिती देण्यात यावी.

स्वच्छता निरीक्षक श्री.हंस :- महानगरपालिका हद्दीत कुत्र्यांची संख्या कमी करण्या करीता नियमीत नसबंदी कार्यक्रम चालू आहे.सदरचे काम करणा-या ठेकेदाराचे एप्रिल पासून देयके देण्यात आलेली नाहीत.आपल्या मागणी नुसार त्यांनी गाडया दिलेल्या नाहीत.एनिमल लॉ नुसार शहरातील मोकाट कुत्रे पकडुन त्यांची नसबंदिकरून चार दिवसांनी कुत्रे ठिक झाल्यानंतर पुन्हा ज्या ठिकाणावरून उचलले त्या ठिकाणी सोडण्यात येतात.

मा.सभापती साहेब :- मागील काही काळापुर्वी श्रीराम चौक,महेश थिएटर्स मागील भागामध्ये अशा प्रकारच्या घटना घडलेल्या आहेत.अशा गंभीर घटना घडून देखील महानगरपालिकेने कोणतीही कार्यवाही केलेली

नाही.सदर घटना गंभीर स्वरूपाच्या असून या बाबत जबाबदारी निश्चीत करण्यात यावी.कमीटी मध्ये आलेले सर्व सदस्य अधिकारी यांनी या घटनेबाबत काहीतरी निर्णय घ्यावा.

मा.श्री.सचिन शिंदे :- शहरातील मोकाट कुत्रे हे ॲनिमल वेस्ट वर जगतात.त्यामुळे ते हिस्त्र झालेले आहेत.ते नागरीकांवर हल्ले करतात.मागील कमीटी मध्ये ॲनिमल वेस्ट रस्त्याच्या बाजुला टाकणा-यांवार कारवाई करणे बाबत आदेशीत करण्यात आले होते.त्यावर सुध्दा काहीही कार्यवाही झालेली दिसुन येत नाही.

वैदयकीय आरोग्य अधिकारी डॉ.बोरगे :- ॲनिमल लॉ २००१ नुसार कुत्र्यांना मारता येत नाही.आपण त्यांची नसबंदी करतो.हिंस्त्र कुत्रे असतील तर तज्ञांचे मार्गदर्शन घेवून पुढील कार्यवाही करतो.

मा.श्री.गणेश कवडे :- सीना नदीच्या आजुबाजुला ॲनिमल वेस्ट मोठया प्रमाणात टाकले जाते.त्यामुळे त्या ठिकाणी मोकाट कुत्र्यांची संख्या मोठया प्रमाणा आहे.कुत्र्यांच्या बंदोबस्ताकरीता महानगरपलिकेला ठोस निर्णय घ्यावा लागेल नाहीतर कुत्र्यांची संख्या वाढुन यापेक्षा भयान हल्यांची शक्यता नाकारता येत नाही.

मा.सभापती साहेब :- कुत्रे पकडण्यासाठी संबंधितांना वारंवार फोन करूनही गाडी येत नाही.श्री.ससाणे यांना भरपाई देण्याची जबाबदारी आरोग्य विभागाची आहे.शहरातील हिंस्त्र कुत्रे मारण्याची सोय आरोग्य विभागाने तातडीने करावी.

वैदयकीय आरोग्य अधिकारी डॉ.बोरगे:-मा.आयुक्त साहेब यांच्या नियंत्रणाखाली कमिटी आहे.त्या कमीटीमध्ये मोकाट कुत्र्यांचा निर्णय घेण्यात येईल.आक्रमक कुत्र्यांचा शास्त्रोक्त पध्दतीने बंदोबस्त करावा लागेल.श्री.ससाणे यांना आर्थिक मदत देणे बाबतचा प्रस्ताव ठेवतो.

मा.श्री.गणेश कवडे :- ऑफिस रिपोर्ट मंजुर करण्यात यावा.

मा.सौ.रूपाली वारे :- ऑफिस रिपोर्ट मंजुर करण्यात यावा.

मा.सभापती साहेब :- कै. बाळासाहेब देशपांडे दवाखान्याकरीता अत्यावश्यक सेवेसाठी करारानुसार तात्पुरत्या स्वरुपात परिचारीका यापदी १) शितल गंगाराम शिंदे २) तृप्ती रावसाहेब बडे यांना तांत्रिक खंड देवुन दिनांक ०२/०८/२०२२ पासुन पुढील सहा महिन्याकरीता अटी व शर्ती प्रमाणे दरमहा मानधनावर करारबध्द पुर्ननियुक्ती करणे बाबतच्या प्रस्तावास मान्यता देण्यात येत आहे.

**ठराव :-** ऑफिस रिपोर्ट नुसार कै. बाळासाहेब देशपांडे दवाखान्याकरीता अत्यावश्यक सेवेसाठी करारानुसार तात्पुरत्या स्वरुपात परिचारीका यापदी १) शितल गंगाराम शिंदे २) तृप्ती रावसाहेब बडे यांना तांत्रिक खंड देवुन दिनांक ०२/०८/२०२२ पासुन पुढील सहा महिन्याकरीता अटी व शर्ती प्रमाणे दरमहा मानधनावर करारबध्द पुर्ननियुक्ती करणे बाबतच्या प्रस्तावास मान्यता देण्यात येत आहे. ऑफिस रिपोर्ट मंजुर.खर्च मंजुर.

कायदेशीर व नियमानुसार पुढील कार्यवाही करण्यात यावी.

सुचक :- मा.श्री.गणेश कवडे सही/-

अनुमोदक :- मा.सौ.रूपाली वारे सही/-

ठराव सर्वानुमते मंजुर.

सही/-
सभापती
स्थायी समिती
अहमदनगर महानगरपालिका

अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर
**मा.स्थायी समिती सभा क्रमांक : ०९**

**विषय क्रमांक : ९४** **दिनांक :- २७/०९/२०२२**

---

**प्रस्तावाचा विषय :-** अहमदनगर महानगरपालिका इलेक्ट्रीक विभाग अत्यावश्यक सेवेसाठी करारानुसार तात्पुरत्या स्वरूपात वायरमन यापदी गायकवाड अरविंद शामराव यांना तांत्रिक खंड देवुन अटी व शर्ती प्रमाणे पुढील सहा महिन्याकरीता मानधनावर करारबध्द पुर्ननियुक्ती बाबत ऑफिस रिपोर्ट.

**प्रस्तावाचा मजकुर:-** अहमदनगर महानगरपालिका आस्थापना विभाग

**संदर्भ : -** इलेक्ट्रीक विभाग यांचेकडील जा. क्र. २९९ दि. ०१ / ०८ / २०२२ अन्वयेचा प्रस्ताव.

उपरोक्त विषयान्वये प्रस्ताव सादर करण्यात येतो की, इलेक्ट्रीक विभाग यांनी त्यांचेकडील जा. क्र. इलेक्ट्रीक विभाग २९९ दि. ०१/०८/२०२२ अन्वये प्रस्ताव सादर करुन त्यामध्ये " इलेक्ट्रीक विभागाकरीता करारानुसार तात्पुरत्या स्वरुपात वायरमन यापदी गायकवाड अरविंद शामराव यांचा अटी व शर्तीनुसार मानधनावरील पुर्ननियुक्तीचा कालावधी दि. ०४/०३/२०२२ ते ०३/०९/२०२२ अखेर सहा महिन्याकरिता असुन सदरची मुदत ही दि. ०४ / ०९ / २०२२ रोजी पासुन समाप्त होणार असल्याने त्यांना तीन दिवसाचा तांत्रिक खंड देवुन पुढील सहा महिन्याकरीता मानधनावर पुर्ननियुक्ती करणेबाबत." सुचित केलेले आहे.

इलेक्ट्रीक विभाग यांचेकडील जा. क्र. ५०४ दि. ०३ / ०८ / २०२२ अन्वयेच्या प्रस्तावाच्या अनुषंगाने सद्यस्थितीमध्ये मा. स्थायी समिती ठराव क्रं. २०५ दिनांक १०/०३/२०२२ अन्वयेच्या मान्यता पारीत ठरावानुसार जा. क्र. आस्था. करारबध्द नेमणुक १०२९ दि. १३/०४/२०२२ अन्वये इलेक्ट्रीक विभागासाठी करारानुसार तात्पुरत्या स्वरुपात वायरमन यापदी गायकवाड अरविंद शामराव यांची रु. १४,२५०/- या दरमहा मानधनावर अटी व शर्ती प्रमाणे तांत्रिक खंड देवून दि. ०४/०३/२०२२ पासुन सहा महिन्याकरीता मानधनावर करारबध्द नियुक्ती करण्यात आलेली आहे,सदर नियुक्तीची मुदत ही दि.०४/०९/२०२२ रोजी पासुन समाप्त होणार आहे.

तरी इलेक्ट्रीक विभाग यांचेकडील वरील संदर्भिय अहवालाच्या अनुषंगाने व महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमामधील कलम ५३ च्या तरतुदीनुसार इलेक्ट्रीक विभाग अत्यावश्यक सेवेसाठी करारानुसार तात्पुरत्या स्वरुपात वायरमन यापदी तीन दिवसांचा तांत्रिक खंड देवून गायकवाड अरविंद शामराव यांची पुढील सहा महिन्यांकरिता अटी व शर्ती प्रमाणे रुपये १४,२५०/- या दरमहा मानधनावर करारबध्द पुर्ननियुक्ती बाबतच्या प्रस्तावास मा. स्थायी समितीची पुर्व मंजुरी मिळणेकामी निर्णयासाठी सादर करणे बाबत निर्णय झाल्यास उक्त प्रकरणी मा. मुख्य लेखाधिकारी व मा. मुख्य लेखापरिक्षक यांचा अभिप्राय घेवून सदरचा प्रस्ताव मा. स्थायी समितीकडे पाठविणेस मंजुरीस्तव आदेशार्थ सादर.

येणे प्रमाणे आस्थापना मुख्य लिपीक यांचा अहवाल असे.

यावर मा.सहा.आयुक्त (आस्था) यांचा अभिप्राय की,प्रस्तावित "अ" नुसार मान्यतेस्तव आदेशार्थ सादर.

यावर मा.मुख्यलेखाधिकारी यांचा अभिप्राय की,प्रस्तावित प्रकरणी आदेशार्थ सादर.

यावर लेखापरिक्षक यांचा अभिप्राय की,मा.शासन सामान्य प्रशासन विभाग शासन परिपत्रक क्र.एस.आार.व्ही.२००५ /प्र.क्र.४७/०५/१२ दि.२५ /८/ २००५ मधील परिच्छेद क्र.५मध्ये "सर्व पदावरील नियुत्या विहीत मार्गाने / माध्यमामार्फत करण्याची दक्षता घ्यावी,अत्यंत तातडीची गरज म्हणून तात्पुरत्या अस्थायी नियुक्या कराव्या लागल्यातर त्या विहीत वेळेत संपुष्टात आणण्याची दक्षता घ्यावी असे नमुद केले आहे.

प्रस्तावित वायरमन या पदी तांत्रीक खंड पुढील मुदतवाढ देताना उपरोक्त शासन परिपत्रकाचे अवलोकन करून उचित कार्यवाही करण्यात यावी.

यावर मा.उपायुक्त (कर) यांचा अभिप्राय की,प्रस्तावित संबंधित विभागप्रमुख ,मुलेअ,मुलेप,यांचे अभिप्रायानुसार पुढील निर्णयासाठी मा.स्थायी समितीसमोर ठेवण्यास आदेशार्थ सादर.

यावर मा.अति.आयुक्त साहेब यांचा अभिप्राय की,विद्युत विभाग प्रमुख यांच्या अभिप्रायासह फेरसादर करावे.

यावर मा.इलेक्ट्रीकल विभाग प्रमुख यांचा अभिप्राय की,मा.फेरसादर,विद्युत विभागास वायरमन आवश्यक आहे.तसेच विद्युत विभागाचा संदर्भिय रिपोर्ट स्वयंस्पष्ट असुन नियमानुसार कार्यवाहीस्तव सविनय सादर.

यावर मा.उपायुक्त (सा) यांचा अभिप्राय की,प्रस्तावितनुसार निर्णयास्तव सादर.

यावर मा.अति.आयुक्त साहेब यांचा अभिप्राय की,प्रस्तावित केल्यानुसार निर्णयास्तव मा.स्थायी समिती कडे पाठविण्यास मान्यतेस्तव सादर.

यावर मा.आयुक्त साहेब यांची सहमतीदर्शक स्वाक्षरी.

सबब प्रकरण मा.स्थायी समिती सभेपुढे सादर.

--**--

**चर्चा :-**

मा.सभापती साहेबः- अहमदनगर महानगरपालिका इलेक्ट्रीक विभाग अत्यावश्यक सेवेसाठी करारानुसार तात्पुरत्या स्वरूपात वायरमन यापदी गायकवाड अरविंद शामराव यांना तांत्रिक खंड देवुन अटी व शर्ती प्रमाणे पुढील सहा महिन्याकरीता मानधनावर करारबध्द पुर्ननियुक्ती बाबत ऑफिस रिपोर्ट.

मा.श्री.रविंद्र बारस्कर : - ऑफिस रिपोर्टचे वाचुन दाखवा.

त्यानुसार सभेमध्ये ऑफिस रिपोर्टचे वाचन करण्यात आले.

मा.सभापती साहेब :- आस्थापना विभाग प्रमुख माहिती सांगा.

आस्थापना विभाग प्रमुख श्री.साबळे :- इलेक्ट्रीक विभागाकरीता नियुक्त करण्यात आलेल्या वायरमन यांची मुदत संपत आहे.विभागाने सादर केलेल्या प्रस्तावानुसार पुर्ननियुक्ती करीता विषया सादर करण्यात आलेला आहे.

मा.श्री.परशराम गायकवाड :-- इलेक्ट्रीक विभागाला वरंवार फोन करूनही आमच्या प्रभागातील एल.ए.डी लाईट बंद आहेत.काम होत नाही.

मा.उपायुक्त श्री.डांगे :- तुमच्या प्रभागातील ज्या ठिकाणच्या लाईट बंद आहेत त्याची नांवे दया.त्या चालू करणे बाबत मी व्यवस्था करतो.

मा.श्री.समद खान :- फकीरवाडा,समिर नगर भागामध्ये गेल्या दोन महिन्यापासून लाईट बंद आहेत.वारंवार फोन करूनसुध्दा लाईट चालू केलेल्या नाहीत.

मा.श्री.गणेश कवडे :- ऑफिस रिपोर्ट मंजुर करण्यात यावा.

मा.सौ.रूपाली वारे :- ऑफिस रिपोर्ट मंजर करण्यात यावा.

मा.सभापती साहेब :- इलेक्ट्रीक विभाग अत्यावश्यक सेवेसाठी करारानुसार तात्पुरत्या स्वरुपात वायरमन यापदी तीन दिवसांचा तांत्रिक खंड देवून गायकवाड अरविंद शामराव यांची पुढील सहा महिन्यांकरिता अटी व शर्ती प्रमाणे दरमहा मानधनावर करारबध्द पुर्ननियुक्ती करणेस मान्यता देण्यात येत आहे.

**<u>ठराव :-</u>** ऑफिस रिपोर्ट नुसार इलेक्ट्रीक विभाग अत्यावश्यक सेवेसाठी करारानुसार तात्पुरत्या स्वरुपात वायरमन यापदी तीन दिवसांचा तांत्रिक खंड देवून गायकवाड अरविंद शामराव यांची पुढील सहा महिन्यांकरिता अटी व शर्ती प्रमाणे दरमहा मानधनावर करारबध्द पुर्ननियुक्ती करणेस मान्यता देण्यात येत आहे.ऑफिस रिपोर्ट मंजुर.खर्च मंजुर.

कायदेशीर व नियमानुसार पुढील कार्यवाही करण्यात यावी.

सुचक :- मा.श्री.गणेश कवडे सही/-

अनुमोदक :- मा.सौ.रुपाली वारे सही/-

ठराव सर्वानुमते मंजुर.

सही/-
सभापती
स्थायी समिती
अहमदनगर महानगरपालिका

# अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर
## मा.स्थायी समिती सभा क्रमांक : ०९

**विषय क्रमांक : ९५** **दिनांक :- २७/०९/२०२२**

---

**प्रस्तावाचा विषय :-** अहमदनगर महानगरपालिका विदयुत विभागाकडील कंत्राटी पध्दतीने नेमलेल्या सेवानिवृत्त अभियंता मानधन १] शिवप्रकाशन भागवन ,२] विजयशंकर तिवारी यांना मुदतवाढ मिळणेबाबतचा ऑफिस रिपोर्ट
**प्रस्तावाचा मजकुर:-** अहमदनगर महानगरपालिका विद्युत विभाग

उपरोक्त संदर्भिय विषयान्वये सादर करण्यात येते की,अहमदनगर महानगरपालिकेच्या विदयुत विभागाकडील कंत्राटी करार पध्दतीने नेमलेल्या वरील संदर्भ क्र.२ अन्वये दोन सेवानिवृत्त अभियंता १)श्री.शिवप्रकाशन भार्गवन २) विजयशंकर तिवारी यांना सहा महिन्याकरीता कार्यालयीन आदेश दिलेला होता.सदरची मुदत दि.०९/०८/२०२२ रोजी समाप्त होत आहे.

महानगरपालिका हद्दीतील विद्युत विभागाअंतर्गत असलेले लाईट बीला संबंधीत कामे ,एम एस ई डी सी एल यांचे समवेत पत्रव्यवहार करणे इत्यादी अंदाजपत्रक तयार करणे तांत्रिक कामे पाहणे कामी कर्मचारी संख्या कमी असल्या कारणाने विद्युत विभागाकडील सेवानिवृत्त इंजिनीअर कंत्राटी करार पध्दतीने नेमलेले आहे.सदरील सेवानिवृत्त इंजिनीयर विद्युत विभागाकडील असलेली संपुर्ण नगर शहरातील वीजबीले व मीटरचे सर्व्हे करून प्रत्यक्ष पाहणी करून म.रा.वि.वि.कं.मर्या अ.नगर यांचे कडे पत्रव्यवहार करून महानगरपालिकेचा आर्थिक फायदा होईल या दृष्टीने योग्य काम करत आहे.त्यामुळे कंत्राटी इंजिनीअर यांची मुदतवाढ करणे आवश्यक आहे.सद्यस्थितीत त्यांचे मानधन रू.३५०००/-आहे.

सेवानिवृत्त अभियंता १)श्री.शिवप्रकाशन भार्गवन २) विजयशंकर तिवारी यांची मुदत दि.९/८/२०२२रोजी समाप्त होत असल्याने त्यांना तीन दिवसांचा तांत्रिक कालखंड देवून दि.१३/०८/२०२२ पासून पुढे मा.स्थायी समिती यांची मंजूरीकरीता सदरचा रिपोर्ट पाठविणे आवश्यक आहे.

तरी विद्युत विभागातील मानधन अभियंता १)श्री.शिवप्रकाशन भार्गवन २) विजयशंकर तिवारी यांना तीन दिवसांचा तांत्रिक कालखंड देवून दि.१३/०८/२०२२ पासून पुढील ६ महिन्याकरीता कंत्राटी करार पध्दतीने मुदतवाढ मिळणेबाबत व सदरचा प्रस्ताव मा.स्थायी समिती यांच्या मंजूरीकरीता पाठविणेस सदरचा प्रस्ताव आदेशार्थ सविनय सादर.

येणे प्रमाणे विद्युत विभाग प्रमुख यांचा अहवाल असे.

यावर मा.उपायुक्त (कर) यांचा अभिप्राय की, "अ" प्रमाणे मान्यतेस सादर.

यावर मा.आयुक्त साहेब यांचा अभिप्राय की,यथा प्रस्तावित मान्य.

सबब प्रकरण मा.स्थायी समिती सभेपुढे सादर.

--**--

मा.सभापती साहेब :- अहमदनगर महानगरपालिका विदयुत विभागाकडील कंत्राटी पध्दतीने नेमलेल्या सेवानिवृत्त अभियंता मानधन १] शिवप्रकाशन भागवन ,२] विजयशंकर तिवारी यांना मुदतवाढ मिळणेबाबतचा ऑफिस रिपोर्ट .

ऑफिस रिपोर्टचे वाचन करण्यात यावे.

सभेमध्ये ऑफिस रिपोर्टचे वाचन करण्यात आले.

मा.श्री.गणेश कवडे :- ऑफिस रिपोर्ट मंजुर करण्यात यावा.

मा.सौ.रूपाली वारे :- ऑफिस रिपोर्ट मंजुर करण्यात यावा.

मा.सभापती साहेब :- विद्युत विभागातील मानधन अभियंता १)श्री.शिवप्रकाशन भार्गवन २) विजयशंकर तिवारी यांना तीन दिवसांचा तांत्रिक कालखंड देवून दि.१३/०८/२०२२ पासून पुढील ६ महिन्याकरीता कंत्राटी करार पध्दतीने मुदतवाढ देण्यात मान्यता देण्यात येत आहे.

**ठराव :-** ऑफिस रिपोर्ट नुसार विद्युत विभागातील मानधन अभियंता १)श्री.शिवप्रकाशन भार्गवन २) विजयशंकर तिवारी यांना तीन दिवसांचा तांत्रिक कालखंड देवून दि.१३/०८/२०२२ पासून पुढील ६ महिन्याकरीता कंत्राटी करार पध्दतीने मुदतवाढ देण्यात मान्यता देण्यात येत आहे.ऑफिस रिपोर्ट मंजुर.खर्च मंजुर.

कायदेशीर व नियमानुसार पुढील कार्यवाही करण्यात यावी.

सुचक :- मा.श्री.गणेश कवडे सही/-

अनुमोदक :- मा.सौ.रूपाली वारे सही/-

ठराव सर्वानुमते मंजुर.

सही/-
सभापती
स्थायी समिती
अहमदनगर महानगरपालिका

**अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर**
**मा.स्थायी समिती सभा क्रमांक : ०९**

**विषय क्रमांक : ९६** **दिनांक :- २७/०९/२०२२**

---

**प्रस्तावाचा विषय :-** अहमदनगर महानगरपालिकेचे विद्युत विभागासाठी करारानुसार तात्पुरत्या स्वरूपात कनिष्ठ अभियंता यापदी जयेश वसंत कोके यांची तांत्रिक खंड देवुन अटी व शर्ती प्रमाणे पुढील सहा महिन्याकरिता मानधनावर करारबध्द पुर्ननियुक्ती बाबत ऑफिस रिपोर्ट.

**प्रस्तावाचा मजकुर:-** अहमदनगर महानगरपालिका विद्युत विभाग

**संदर्भ :** १) विद्युत विभाग प्रमुख, यांचेकडील जा.क्र. विद्युत विभाग ९४ दि. १८/०५/२०२२ अन्वयेचा प्रस्ताव.

२) जयेश वसंत कोके यांचा दि. १७/०५/२०२२ रोजीचा मानधन वाढ करुन पुर्ननियुक्ती करणेबाबतचा अर्ज.

उपरोक्त विषयान्वये प्रस्ताव सादर करण्यात येतो की, विद्युत विभाग यांनी त्यांचेकडील जा. क्र. विद्युत विभाग ९४ दि. १८/०५/२०२२ अन्वये प्रस्ताव सादर करुन त्यामध्ये " श्री. जयेश वसंत कोके, विद्युत विभागामध्ये कनिष्ठ अभियंता ( BE मेकॅनिकल) या पदावर कार्यरत असून त्यांची दि. ११/०६/२०२२ रोजी ऑर्डर संपुष्टात येणार आहे, नमूद कंत्राटी पध्दतीने नियुक्त अभियंता यांनी त्यांना नेमून दिलेले काम उत्कृष्ठ व जबाबदारीने करत असून अहमदनगर महानगरपालिकेच्या विद्युत विभागामार्फत विविध कामे चालू असून या अनुषंगाने अभियंत्यांची आवश्यकता असल्याने व जयेश वसंत कोके यांची नेमणूक दि. ११/०६/२०२२ पर्यत संपुष्टात येत असल्याने त्यांना तीन दिवसाचा तांत्रिक खंड देवुन पुढिल ६ महिन्याची मुदतवाढ व वेतनावाढ देणे बाबतची पुढील कार्यवाही आस्थापना विभागामार्फत करणे उचित होईल, तसेच श्री. कोके यांनी संदर्भिय अर्जानूसार वेतनवाढ मिळणेबाबत विनंती अर्ज केलेला असून जयेश वसंत कोके यांची नियुक्ती कनिष्ठ अभियंता ( BE मेकॅनिकल) वर असून सद्यस्थितीत त्यांना रु. २५,०००/- इतके मानधन देण्यात येत आहे. सदर कर्मचारी यांचे कामाचा आढावा घेता त्यांच्यावर विविध जबाबदारी व कार्यालयीन कामे सोपविण्यात आलेले आहेत, व त्यांना बाहेरीला आऊटडोअरचे कामांचीही जबाबादारी सोपवण्यात आलेली असून ते सर्व जबाबादारी उत्तमरित्या पार पाडत आहे, तरी श्री. जयेश वसंत कोके यांच्या कामाचा स्वरुप पाहता व त्यांच्या मागणीनुसार सद्यस्थितीच्या वेतनामध्ये २५ टक्के वाढ न देता २० टक्के वेतनवाढ करण्यास हरकत नाही, तसेच ३ दिवसाचा तांत्रिक खंड देवून पुढील ६ महिन्याची मुदतवाढ देणे व वेतनवाढ देणेबाबत." नमूद करुन सुचित केलेले आहे.

तसेच दिनांक १७/०५/२०२२ रोजी जयेश वसंत कोके यांनी देखील अर्ज देवून विद्युत विभागामध्ये कार्यरत असून दि. ११/०६/२०२२ रोजी मानधनावरील नियुक्ती संपुष्टात येणार असून पुढील पुर्ननियुक्ती करणेबाबत तसेच कामाची जबाबदारी तसेच ई स्मार्ट पथदिवे बसविण्याचे काम एकहाती संभाळलेले आहे, व सद्यस्थितीमध्ये मिळणारे वेतनामध्ये त्यात २५ टक्के मानधनवाढ करणेबाबत सुचित केलेले आहे.

सद्यस्थितीमध्ये मा. स्थायी समिती ठराव क्रं. १४६ दि. ११/०१/२०२२ च्या पुर्व मान्यता पारीत ठरावाच्या अनुषंगाने जा. क्र. आस्था. करारबध्द नेमणुक ८०८ दि. २५/०३/२०२२ अन्वये विद्युत विभागासाठी करारानुसार तात्पुरत्या स्वरुपात कनिष्ठ अभियंता (बी.ई.मेकॅनिकल) यापदी कोके जयेश वसंत यांची नुकतेच वरील दि. ११/०१/२०२२ रोजीच्या पारीत ठरावामध्ये नमूद केल्यामुळे यापुर्वीच्या नियुक्तीमधील दरमहा रु. २०,०००/- वरुन दरमहा रु. २५,०००/- या मानधनावर मानधनामध्ये वाढ करुन अटी व शर्ती प्रमाणे तांत्रिक खंड देवून दि. १२/१२/२०२१ पासुन सहा महिन्याकरीता करारबध्द पुर्ननियुक्ती करण्यात आलेली असुन सदरची मुदत ही दि. १२/०६/२०२२ रोजी पासुन समाप्त होणार आहे.

यापुर्वी मोटर व्हेईकल विभाग प्रमुख, घनकचरा व्यवस्थापन विभाग, तसेच विद्युत विभाग प्रमुख यांचे प्रस्तावाच्या अनुषंगाने अहमदनगर महानगरपालिकेमध्ये श्री. जयेश वसंत कोके यांची तात्पुरत्या स्वरुपात कनिष्ठ अभियंता यापदी

तांत्रिक खंड देवून सहा - सहा महिन्याकरिता अटी व शर्ती प्रमाणे दरमहा मानधनावर नियुक्ती बाबत मा. स्थायी समितीच्या मंजुरी प्राप्त ठरावाच्या अनुषंगाने वेळोवेळी कार्यवाही करण्यात येत असून संबधितांची यापुर्वी केलेल्या मानधनामध्ये वाढ बाबतची माहीती खालील प्रमाणे आहे.

| अ.नं | नियुक्ती आदेश क्रं. दि. | दरमहा मानधन रु. | केव्हा पासून मानधन वाढ दि. | नियुक्ती विभाग | मा.स्था.स.ठ.क्रं.दि. |
|---|---|---|---|---|---|
| १ | ३६२७/१३/०८/२०१४ | २०,०००/- | दि.१३/०८/२०१४ पासून | मोटर व्हेईकल विभाग | वर्तमान पत्रामधील प्रसिध्द जाहिरातीच्या अनुषंगाने मा. आयुक्त यांचे मान्यतेने. |
| २ | १६९१/०९/०६/२०२१ | २०,०००/- | दि.०९/०६/२०२१ पासून | घनकचरा व्यव.विभाग | मा. स्था. स. ठ. क्रं. ८० दि. ०९ / ०२ / २०२१ चा पारीत ठरावानुसार नियुक्ती. |
| ३ | ८०८/२५/०३/२०२२ | २५,०००/- | दि.१२/१२/२०२१ पासून | विद्युत विभाग | मा. स्था. स. ठ. क्रं. १४६ दि. ११ / ०१ / २०२२ चा पारीत ठराव. |

वरील संदर्भिय प्रस्ताव तसेच संबधित मागणी अर्जदार जयेश वसंत कोके यांचे दि. १७/०५/२०२२ रोजीचे मागणी अर्जानुसार दरमहा मानधनामध्ये वाढ करुन पुर्ननियुक्ती करणेबाबतचा विषय हा सद्यस्थितीमधील मनपाची बिकट आर्थिक परिस्थिती, तसेच धोरणात्मक आर्थिक विषय असल्याने याबाबत उचित निर्णय होणे आवश्यक आहे.

तरी संदर्भिय अहवाल व संबधित अर्जदार यांचे अर्जाच्या अनुषंगाने व महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमा मधील ५३ च्या तरतुदीनुसार विद्युत विभाग अत्यावश्यक सेवेसाठी करारानुसार तात्पुरत्या स्वरुपात कनिष्ठ अभियंता (बी.ई.मेकॅनिकल) यापदी कोके जयेश वसंत यांना तीन दिवसाच्या तांत्रिक खंड देवुन दि. १५/०६/२०२२ पासून पुढील सहा महिन्याकरीता मानधन वाढ विषया बाबत उचित निर्णय होवून अटी व शर्ती प्रमाणे दरमहा मानधनावर करारबध्द पुर्ननियुक्ती करणे बाबतच्या प्रस्तावास मा. स्थायी समितीची पुर्व मंजुरी मिळणे कामी निर्णयासाठी सादर करणे करीता मा. मुख्य लेखाधिकारी व मा. मुख्य लेखापरिक्षक यांचा अभिप्राय घेवुन सदरचा प्रस्ताव मा. स्थायी समितीकडे पाठविणेस मंजुरीस्तव आदेशार्थ सादर.

येणे प्रमाणे सहा.आयुक्त ,आस्थापना यांचा अभिप्राय असे.

यावर मुख्यलेखाधिकारी यांचा अभिप्राय की,मानधनवाढ व मुदतवाढीबाबत आदेशार्थ सादर.

यावर अंतर्गत लेखापरिक्षक यांचा अभिप्राय की,मा.शासन सामान्य प्रशासन विभाग शासन परिपत्रक क्र.एस.आार.व्ही.२००५ /प्र.क्र.४७/०५/१२ दि.२५ /८/ २००५ मधील परिच्छेद क्र.५मध्ये "सर्व पदावरील नियुत्या विहीत मार्गाने / माध्यमामार्फत करण्याची दक्षता घ्यावी,अत्यंत तातडीची गरज म्हणून तात्पुरत्या अस्थायी नियुक्या कराव्या लागल्यातर त्या विहीत वेळेत संपुष्टात आणण्याची दक्षता घ्यावी असे नमुद केले आहे.

प्रस्तावित कनिष्ठ अभियंता या पदी तांत्रीक खंड पुढील मुदतवाढ देताना उपरोक्त शासन परिपत्रकाचे अवलोकन करून प्रस्तावित "अ" बाबत उचित निर्णय घेता येईल.

यावर मा.उपायुक्त (सा) यांचा अभिप्राय की,मागील मानधनवाढ कधी दिली आहे?सादर करा.

यावर मुख्यलिपीक यांचा अभिप्राय की,प्रस्तुत प्रकरणांवरील मा.उपायुक्त (सा) यांचे दि.१४/०६/२०२२ रोजीचे शेरांकनानुसार की,विद्युत विभागासाठी तात्पुरत्या कनिष्ठ अभियंता यापदी कोके जयेश वसंत यांची पुर्ननियुक्ती बाबतचा प्रस्ताव निर्णयासाठी यापुर्वी जा.क्र.आस्था१८११ दि.२/१२/२०२१ अन्वये मा स्थायी समितीकडे पाठविण्यात आलेला होता.मा.स्थायी समिती ठराव क्रमांक १४६ दि.११/०१/२०२२ अन्वये ठराव पारीत करून जयेश वसंत कोके यांचे दरमहा मानधन रू.२०,०००/- वरून रू.२५,०००/- इतके जा.क्र.आस्था करारबध्द

नेमणूक ८०८ दि.२५/०३/२०२२ अन्वयेच्या आदेशानुसार दि.१२/१२/२०२१ पासून करण्यात आलेले आहे.तरी प्रस्तुत प्रकरणी आदेशार्थ सादर.

यावर मा.सहा.आयुक्त(आस्थापना) यांचा अभिप्राय की,"अ" नुसार आदेशार्थ सादर

मा.उपायुक्त(सा) यांचा अभिप्राय की,प्रस्तावित "अ" नुसार मागील मानधनवाढ दि.१२/१२/२०२१ पासून दिली आहे.व मुलेप यांचे अभिप्रायानुसार पुढील कार्यवाही करणेस निर्णयार्थ सादर.

यावर मा.अतिरीक्त आयुक्त साहेब यांचा अभिप्राय की,मुलेप यांचा अभिप्राय घेण्यास व त्यानंतर कार्यवाही करणेस निर्णयास्तव सादर.

यावर मा.आयुक्त साहेब यांची स्वाक्षरी.

यावर मा.मुख्यलेखापरिक्षक यांचा अभिप्राय की,सदर प्रस्तावावर दि.१३/०६/२०२२ रोजी मुलेप यांनी अभिप्राय नोंदविलेले आहेत.त्याप्रमाणे विभागाने कार्यवाही करावी.

यावर मा.अति.आयुक्त साहेब यांचा अभिप्राय की,मुलेप यांनी दि.१२/६/२०२२ रोजी मानधनावर नियुक्ती बाबत आभिप्राय दिला आहे.परंतु मानधना बाबत अभिप्राय देणे अपेक्षित आहे.त्यामुळे मानधनाबाबत मुलेप यांचा अभिप्राय घेतल्यानंतरच कार्यवाही करणे उचित होईल.तथापी निर्णयास्तव सादर.

यावर मा.आयुक्त साहेब यांची स्वाक्षरी.

यावर मा.मुख्यलेखापरिक्षक यांचाअभिप्राय की,१ प्रस्तावात मानधन वाढीबाबत आस्थापना विभागाने स्वयंस्पष्ट अभिप्राय नोंदविलेले नाही.२.श्री.जयंत वसंत कोके कनिष्ठ अभियंता यांना दिनांक १२/१२/२१ पासून रू.५०००/- मानधन वाढ देवून एकुण मानधन २५०००/-अदा करण्यात येत असलेबाबत प्रस्तावात दिसुन येते.३.साधारणपणे २५% वेतनवाढ दिल्याचे निदर्शनास येते सदरची वाढ ही १२/१२/२१ रोजी पासून दिलेली असल्याने सहा महिन्यातच पुनश्चः वेतनवाढीची मागणी केलेली असल्याने ती मान्य केल्यास एकाच वर्षात ५०%वेतनवाढ दिसून येते.याबाबत वेतनवाढीच्या नियमानुसार आस्थापना विभागाने कार्यवाही करणे अपेक्षीत आहे.

उपरोक्त बाबींचे अवलोकन करता प्रस्ताव उचित निर्णयास्तव सादर.

यावर मा.अति.आयुक्त साहेब यांचा अभिप्राय की,मुलेप यांनी प्रस्तावित केल्यानुसार निर्णयास्तव सादर.

यावर मा.आयुक्त साहेब यांचा अभिप्राय की,मुलेप यांनी पुर्तता करून फेरसादर करावे.

फेरसादर,

उपरोक्त विषयान्वये की, मा.आयुक्त यांचे दिनांक ११/०७/२०२२ रोजीचे शेरांकनानुसार खालील प्रमाणे पुर्ततेच्या अनुषंगाने खुलासा सादर करण्यात येते आहे.

| अ.नं. | मा. मुख्य लेखापरिक्षक यांचे शेरांकन | अभिप्राय |
|---|---|---|
| १ | प्रस्तावात मानधन वाढीबाबत आस्थापना विभागाने स्वयंसष्ट अभिप्राय नोंदवलेले नाही. | विद्युत विभागासाठी तात्पुरत्या स्वरुपात कनिष्ठ अभियंता (बी.ई.मेकॅनिकल) यापदी कोके जयेश वसंत यांची लगतच्या मा.स्थायी समिती ठराव क्रं. १४६ दि.११/०१/२०२२ अन्वये ठराव पारीत करुन दरमहा रु. २०,०००/- वरुन रु. २५,०००/- इतके दि. १२/१२/२०२१ पासून करण्यात आलेले आहे. पुनश्चः कोके यांनी लगचेच दरमहा मानधनामध्ये वाढ करणेबाबत दि. १७/०५/२०२२ रोजी अर्ज देवून पुनश्चः मागणी केलेली आहे. मानधनावरील नियुक्तीचे मानधन किती असावे, व किती वेळेस वाढ करावीत याबाबत मा.शासनाचे कोणेतेही निर्णय उपलब्ध नाहीत, त्यामुळे प्रस्तुत प्रकरणावर सष्ट अभिप्राय नोंदविण्यामध्ये अडचण निर्माण झालेली आहे. |

| | | |
|---|---|---|
| २ | श्री.जयेश वसंत कोके , कनिष्ठ अभियंता यांना दिनांक १२/१२/२०२१ पासून रु. ५,०००/- मानधन वाढ देऊन एकुण मानधन रु. २५,०००/- अदा करण्यात येत असलेबाबत प्रस्तावात दिसुन येते. | मा.स्थायी समिती ठराव क्रं. १४६ दि. ११/०१/२०२२ अन्वये ठराव पारीत केल्यामुळे श्री. कोके यांची दि. १२/१२/२०२१ पासून दरमहा रु. ५,०००/- या दरमहा मानधनामध्ये वाढ करुन दरमहा रु. २५,०००/- या मानधनावर नियुक्तीबाबत सद्यस्थितीमध्ये कार्यवाही करण्यात येवून संबधितांनी सदरचा अर्ज दिल्यामुळे त्यानुषंगाने विषयासह प्रस्तुत प्रस्ताव प्रस्तावित करण्यात आलेला आहे. |
| ३ | साधारणे २५% वेतनवाढ दिल्याचे निदर्शनास येते, सदरची वाढ ही दि.१२/१२/२०२१ रोजी पासून दिलेली असल्याने सहा महिन्यातच पुनश्चः वेतनवाढीची मागणी केलेली असल्याने ती मान्य केल्यास एका वर्षात ५०% वेतनवाढ दिसुन येते बाबत वेतनवाढीच्या नियमानुसार आस्थापना विभागाने कार्यवाही करणे अपेक्षित आहे. | अहमदनगर महानगरपालिकेमधील कायम नियुक्ती पदी कर्मचा-यांना प्रचलित पध्दतीने मा. शासनाचे निर्देशानुसार दरवर्षी ३% प्रमाणे वार्षिक एकदाच वेतनवाढ लागू करुन कार्यवाही करण्यात येते.<br>तथापि मानधनावरील नियुक्ती वरील कर्मचा-यांना किती वाढ करावी अथवा किती वेळेस वाढ करावी याबाबत स्पष्ट निर्देश नाहीत, त्यामुळे प्रस्तुत प्रकरणी मानधन वाढी विषयाबाबत आस्थापना विभागास मा.लेखा परिक्षण विभागाने प्रस्तुत विषयी मार्गदर्शन करणेस विनंती आहे. त्यानुसार पुढील आवश्यक कार्यवाही करणेत येईल. |

यावर मा.सहा.आयुक्त (आस्थापना ) यांचा अभिप्राय की,प्रस्तावित केल्यानुसार मुद्दा क्र.१,२ व ३ बाबत आदेशार्थ तथा निर्णयास्तव सादर.

यावर मा.उपायुक्त (सा) यांचा अभिप्राय की,मुलेप अभिप्राय

यावर मा.मुख्यलेपापरिक्षक यांचा अभिप्राय की,विभागाने केलेल्या फेरसादर खुलाशानुसार "अ" प्रमाणे उचित निर्णयास्तव सादर.

यावर मा.उपायुक्त (सा ) प्रस्तावित केल्यानुसार मा.स्थायी समितीकडे निर्णयास्तव पाठविण्यास.

यावर मा.अति.आयुक्त साहेब यांचा अभिप्राय की,उपायुक्त(सा) यांच्या अभिप्रायानुसार मान्यतेस्तव सादर.

यावर मा.आयुक्त साहेब यांचा अभिप्राय की,प्रस्तावित नुसार मा.स्थायी समिती समोर सादर करणेस्तव मान्य.

सबब प्रकरण मा.स्थायी समिती सभेपुढे सादर.

--**--

**चर्चा :-**

मा.सभापती साहेब :- अहमदनगर महानगरपालिकेचे विद्युत विभागासाठी करारानुसार तात्पुरत्या स्वरूपात कनिष्ठ अभियंता यापदी जयेश वसंत कोके यांची तांत्रिक खंड देवुन अटी व शर्ती प्रमाणे पुढील सहा महिन्याकरिता मानधनावर करारबध्द पुर्ननियुक्ती बाबत ऑफिस रिपोर्ट.

मा.श्री.गणेश कवडे :- ऑफिस रिपोर्ट वाचून दाखवा.

त्यानुसार सभेमध्ये ऑफिस रिपोर्टचे वाचन करण्यात आले.

मा.श्री.गणेश कवडे :- ऑफिस रिपोर्ट मंजुर करण्यात यावा.

मा.सौ.रूपाली वारे :- ऑफिस रिपोर्ट मंजुर करण्यात यावा.

मा.सभापती साहेब :- विद्युत विभाग अत्यावश्यक सेवेसाठी करारानुसार तात्पुरत्या स्वरुपात कनिष्ठ अभियंता (बी.ई.मेकॅनिकल) यापदी कोके जयेश वसंत यांना तीन दिवसाच्या तांत्रिक खंड देवुन दि.

१५/०६/२०२२ पासून पुढील सहा महिन्याकरीता मानधन वाढ विषया बाबत उचित निर्णय होवून अटी व शर्ती प्रमाणे दरमहा मानधनावर करारबध्द पुर्ननियुक्ती करणेस मान्यता देण्यात येत आहे.

**<u>ठराव :-</u>** ऑफिस रिपोर्ट नुसार विद्युत विभाग अत्यावश्यक सेवेसाठी करारानुसार तात्पुरत्या स्वरुपात कनिष्ठ अभियंता यापदी कोके जयेश वसंत यांना तीन दिवसाच्या तांत्रिक खंड देवुन दि. १५/०६/२०२२ पासून पुढील सहा महिन्याकरीता मानधन वाढ विषया बाबत उचित निर्णय होवून अटी व शर्ती प्रमाणे दरमहा मानधनावर करारबध्द पुर्ननियुक्ती करणेस मान्यता देण्यात येत आहे.ऑफिस रिपोर्ट मंजुर.खर्च मंजुर.

कायदेशीर व नियमानुसार पुढील कार्यवाही करण्यात यावी.

सुचक :- मा.श्री.गणेश कवडे सही/-

अनुमोदक :- मा.सौ.रुपाली वारे सही/-

ठराव सर्वानुमते मंजुर.

सही/-
सभापती
स्थायी समिती
अहमदनगर महानगरपालिका

**अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर**
**मा.स्थायी समिती सभा क्रमांक : ०९**

---

**विषय क्रमांक : ९७** **दिनांक :- २७/०९/२०२२**

---

**प्रस्तावाचा विषय :-** अहमदनगर महानगरपालिका सन २०२२-२३ या वित्तीय वर्षात पुनर्विनियोजन अंदाजपत्रक करणे बाबतचा बांधकाम विभागाचा दिनांक १०/०८/२०२२ रोजीचा प्रस्तावा बाबत ऑफिस रिपोर्ट.

**प्रस्तावाचा मजकुर:-** अहमदनगर महानगरपालिका अर्थ विभाग

**संदर्भ :-** बांधकाम विभागाचा दि.१०/०८/२०२२ चा प्रस्ताव.

उपरोक्त विषयाचे संदर्भाकित प्रस्तावानुसार सादर करणेत येते की,अहमदनगर महानगरपालकेच्या सन २०२२-२३ चे पुनर्विनियोजन अंदाजपत्रकबाबत महाराष्ट्र महानगरपलिका अधिनियम मधील कलम १०३ व अनुसुची "ड" मधील प्रकरण ७ मधील २(२) (अ)(ब)(क) अन्वये रकमा कमी करणे किंवा बदली करणे नुसार प्रस्ताव ठेवण्यात येत आहे.

उपरोक्त नियमानुसार स्थायी समितीस सरकारी वर्षात कोणत्याही वेळी-

(अ) अर्थसंकल्पीय अनुदानाची रक्कम कमी करता येईल.

(ब ) अर्थसंकल्पीय अनुदानातील कोणतीही रक्कम एका गौण शीर्षातुन दुस-या गौण शीर्षात किंवा एका गौण शीर्षाखालील दुय्यक शीर्षातुन दुस-या गौण शीर्षाखालील दुय्यम शीर्षात बदली करण्यास मंजुरी देता येईल.

(क) गौण शीर्षाखालील पाच हजार रूपयांपेक्षा अधिक असेल अशी कोणतीही रक्कम,एका दुय्यम शीर्षातून दुस-या दुय्यम शीर्षात किंवा एका प्राथमिक घटकातून दुस-या प्राथमिक घटकात बदली करण्यास मंजुरी देता येईल,अशी तरतुद आहे.

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम मधील कलम १०३ नुसार "रकमा कमी करणे किंवा बदली करणे " या तरतुदीनुसार "कोणत्याही अर्थसंकल्पीय शिर्षात कमी करावयाच्या रकमा नियमानुसार कमी केल्या पाहिजेत आणि एका अर्थसंकल्पीय शिर्षातुन दुस-या अर्थसंकल्पीय शिर्षातर्गत बदली करावयाच्या रकमा नियमानुसार बदली केल्या पाहिजेत" अशी तरतुद असल्याने प्रकरण ७ मधील २(२) मधील (अ)(ब)(क) नुसार सन २०२२-२०२३ चे पुनर्विनियोजन अंदाजपत्रक तयार करण्यात आले आहे.

तरी सोबत जोडलेले सन २०२१-२०२२ चे पुनर्विनियोजन अंदाजपत्रक मंजुरीस्तव मा.स्थायी समितीसमोर ठेवणे नियमानुसार योग्य राहिल.कृपया आदेशार्थ सादर.

येणे प्रमाणे अहवाल असे.

यावर मुख्यलेखाधिकारी यांचा अभिप्राय की,अधिनियम कलम १०१ नुसार स्थायी समितीच्या शिफारशीवरून महानगरपालिकेस वेळोवेळी सरकारी वर्षात,अर्थसंकल्पीय अनुदानात वाढ करता येईल,सबब बांधकाम विभागाचा प्रस्ताव पुढील कार्यवाहीस्तव सादर. /"अ"

यावर मा.उपायुक्त (सा) यांचा अभिप्राय की,प्रस्तावित "अ" नुसार कार्यवाही करणेस मान्यतेस्तव सादर.

यावर मा.अति.आयुक्त साहेब यांचा अभिप्राय की,सर्व विभागप्रमुखांकडुन पनर्विनियोजन बाबत प्रस्ताव मागणी करणे उचित होईल.कारण की,फक्त बांधकाम विभागाचा प्रस्ताव झाला आहे.इतर विभागांकडुन प्रस्ताव मागवून नंतर मा.स्थायी समिती समोर ठेवणे उचित होईल.निर्णयास्तव सादर.

यावर मा.आयुक्त साहेब यांचा अभिप्राय की,"अ" मान्य.

सबब प्रस्ताव मा.स्थायी समिती सभेपुढे सादर.

--**--

महाराष्ट्र नगरपरिषद लेखासंहिता १९७१ चा नमुना क्रमांक १० नियम ३० (३) पहा

अहमदनगर महानगरपालिका अ.नगर

सन २०२२-२०२३ चे सादर केलेले पुनर्विनियोजनाचे विवरणपत्र

| | या शिर्षातून | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| अ.क्र | प्रधान, गौण व तपशीलवार शीर्ष | बांधकाम विषयक सेवा वगैरे | मुळ अनुदान २०२२-२३ | दि.२६ ऑगस्ट २२ अखेरचा खर्च | उपलब्ध शिल्लक (प्रस्तावीत कमी करावयाची रक्कम ) | (४-६) सुधारित तरतुद | अभिप्राय |
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ |
| १ | बांधकाम विभाग | ठेकेदार (इतर अनामत) | ६३०००००० | ५४३६३६० | २०००००० | ४३०००००० | बांधकाम विभागाचा प्रस्ताव |
| | पाणी पुरवठा विभाग | रस्ता रूंदीकरणामुळे बाधित होणा-या पाईप लाईन स्थलांतरीत / नव्याने करणे | ७५ | ० | ३५ | ४० | पाणी पुरवठा योजना पुर्ण करणेकामी ठेकेदाराची राखीव ठेवलेली डिपॉझीटमध्ये ठेवलेली रकमे अदाईसाठी |
| | | एकुण रक्कम (तरतुद) | | | २०००००० | | |

***

| | हया शिर्षातून | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| अ.क्र | प्रधान, गौण व तपशीलवार शीर्ष | बांधकाम विषयक सेवा वगैरे | मुळ अनुदान २०२२-२३ | २६ऑगस्ट २२ अखेरचा खर्च | प्रस्तावीत वाढीची रक्कम | अभिप्राय (११+१३) सुधारित तरतुद | अभिप्राय |
| ९ | १० | ११ | १२ | १३ | १४ | १५- | १६ |
| १ | बांधकाम विभाग | ई डिपॉझिट | २५०००००० | २४५२९०६ | १५०००००० | १७५०००००० | बांधकाम विभागाचा प्रस्ताव |
| | | तांत्रिक लेखा परिक्षण फी | ३०००००० | ० | ५०००००० | ८०००००० | बांधकाम विभागाचा प्रस्ताव |
| | | एकुण रक्कम(तरतुद) | | | २०००००० | | |

**चर्चा :-**

मा.सभापती साहेबः- अहमदनगर महानगरपालिका सन २०२२-२३ या वित्तीय वर्षात पुनर्विनियोजन अंदाजपत्रक करणे बाबतचा बांधकाम विभागाचा प्रस्ताव.

मा.श्री.रविंद्र बारस्कर :- ऑफिस रिपोर्ट वाचून दाखवा.

त्यानुसार सभेमध्ये ऑफिस रिपोर्टचे वाचन करण्यात आले.

मा.सभापती साहेब :- या बाबतची सविस्तर माहिती सांगा.

मुख्यलेखाधिकारी श्री.मोरे :- महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम मधील कलम १०३ नुसार "रकमा कमी करणे किंवा बदली करणे " या तरतुदीनुसार "कोणत्याही अर्थसंकल्पीय शिर्षात कमी करावयाच्या रकमा नियमानुसार कमी केल्या पाहिजेत आणि एका अर्थसंकल्पीय शिर्षातुन दुस-या अर्थसंकल्पीय शिर्षातर्गत बदली करावयाच्या रकमा नियमानुसार बदली केल्या पाहिजेत" अशी तरतुद असल्याने प्रकरण ७ मधील २(२) मधील (अ)(ब)(क) नुसार सन २०२२-२०२३ चे पुनर्विनियोजन अंदाजपत्रक तयार करण्यात आले असून शिफारसी करीता मा.स्थायी समितीसमोर ठेवण्यात आले आहे.

मा.श्री.गणेश कवडे :- बांधकाम विभागाकरीता सन २०२२-२०२३ चे पुनर्विनियोजन अंदाजपत्रकास मा.महानगरपालिका सभे पुढे सादर करण्याची शिफारस करण्यात यावी.

मा.श्री.समद खान :- .आगामी सर्वसाधारण सभेमध्ये मान्यता घेण्याच्या अटीवर ऑफिस रिपोर्ट मंजुर करण्यात यावा.

मा.सभापती साहेब :- बांधकाम विभागातील प्रस्तावित कमी करावयाची रक्कम त्या त्या लेखाशिर्षाला कमी पडणार नाही याची दक्षता घेण्यात यावी. बांधकाम विभाग ठेकेदार (इतर अनामत)या लेखाशिर्षा मधून २ कोटी कमी करून ई - डिपॉझिट लेखाशिर्षावर रक्कम रूपये १ कोटी ५०लाख व तांत्रिक लेखा परिक्षण फी रक्कम रूपये ५० लाख वर्ग बाबतच्या लेखा विभागाकडून सादर करण्यात आलेल्या तक्त्यानुसार बांधकाम विभागाकरीता सन २०२२-२०२३ चे पुनर्विनियोजन अंदाजपत्रकास मा.महानगरपालिका सभे पुढे सादर करण्याची शिफारस करण्यात येत आहे.आगामी सर्वसाधारण सभेमध्ये मान्यता घेण्याच्या अटीवर ऑफिस रिपोर्ट मंजुर.

**ठराव** :- ऑफिस रिपोर्ट नुसार बांधकाम विभागातील प्रस्तावित कमी करावयाची रक्कम त्या त्या लेखाशिर्षाला कमी पडणार नाही याची दक्षता घेण्यात यावी. बांधकाम विभाग ठेकेदार (इतर अनामत)या लेखाशिर्षा मधून २ कोटी कमी करून ई - डिपॉझिट लेखाशिर्षावर रक्कम रूपये १ कोटी ५०लाख व तांत्रिक लेखा परिक्षण फी रक्कम रूपये ५० लाख वर्ग बाबतच्या लेखा विभागाकडून सादर करण्यात आलेल्या तक्त्यानुसार बांधकाम विभागाकरीता सन २०२२-२०२३ चे पुनर्विनियोजन अंदाजपत्रकास शिफारस करण्यात येत आहे.आगामी सर्वसाधारण सभेमध्ये मान्यता घेण्याच्या अटीवर ऑफिस रिपोर्ट मंजुर.

कायदेशीर व नियमानुसार पुढील कार्यवाही करण्यात यावी.

सुचक :- मा.श्री.गणेश कवडे सही/-

अनुमोदक :- मा.श्री. समद खान सही/-

ठराव सर्वानुमते मंजूर.

सही/-
सभापती
स्थायी समिती
अहमदनगर महानगरपालिका

अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर
**मा.स्थायी समिती सभा क्रमांक : ०९**

---

**विषय क्रमांक : ९८** **दिनांक :- २७/०९/२०२२**

---

**प्रस्तावाचा विषय :-** अहमदनगर महानगरपालिका सार्वजनिक उद्यान विभागा करिता **प्रभाग क्र.०७** मध्ये विविध ठिकाणी बसविणेसाठी Cast Iron Bench-७५नग प्रत्यक्ष ठिकाणी पुरवठा करून बसवून देणेकामी केलेल्या संविदेची महिती महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ७३(ड) अन्वये माहिती बाबतचा ऑफिस रिपोर्ट.

**प्रस्तावाचा मजकुर:-** अहमदनगर महानगरपालिका स्टोअर विभाग

उपरोक्त विषय व संदर्भास अनुसरुन विनंती रिपोर्ट की,उद्यान विभागारिता भाग क्र.७ मधील विविध ठिकाणी जेष्ठ नागरिकांना,महिला वर्ग यांना बसण्यासाठी कास्ट आयर्न बेंन्च - ७५ नग खरेदी करुन मिळणेबाबत संदर्भिय मागणी प्रस्ताव प्राप्त झालेला आहे.

**कास्ट आयर्न बेंचचा तपशील -**

**Providing & Fixing Cast Iron Bench -**

**Technical Specification**

• **FRP 'C' channel wood finish Patti : C -** Section FRP channel strip of thickness up to 6 mm and 1200 mm long with minimum 8 nos wooden finish bolted to both the side frames.The seating portion and backrest is made up of FRP.At the end of the strips nylon end caps are given to prevent dust particles from entering in it.

• **FRP product :** All the Fiber Reinforced Plastics (FRP) materials are processed by the hand laid process which is considered to be the best of its type.We use international quality of Gel coats which is duly mixed with U.V.stabilized pigment to give the required colour to the product.Thickness of the FRP material varies from 4 mm to 6 mm as per the product.

• **Bench frame :** I-section bench frame with bend welded on one side for bolting the FRP C-Channel strip.The Bench frame thickness shall be 30 mm approx.made up of cast iron is sand casting process.

• **Powder Coating :** It shall be done with pure polyester raw material.Dry film Thickness maintained within the range of 50-70 microns.

• **Nut and Bolts :** Galvanized / S.S.& Nuts / Nylon Lock Nuts are used with PVC Bolt Caps.All open ends of pipe been closed by GI/PVC caps for user safety against entrapment The overall **Weight** of bench shall be **55 kg** approx.Normal Seat Height of bench shall be 18" approx from ground level.

The legs pipes are embedded in C.C.Blocks (M20 mix)of size 0.45 x 0.45 x 0.45.

Descriptions :

• **Product Area :** 1.2m x 0.6m (4ft x 2ft) Approx

• **Capacity :** 3 Adult

यापुर्वी उद्यान विभागाकडील जा.क्र.३९६ दि.१०/०२/२०२२ चे मागणी प्रस्तावान्वये उपरोक्त स्पेसिफिकेशन प्रमाणे कास्ट आयर्न बेंन्च - ७५ नग खरेदीकामी ई-निविदा क्र.2022_ANMC_781736_1 व उद्यान विभाग जा.क्र.४३८,४३९ व ४४१ दि.३०/०३/२०२२ चे मागणी प्रस्तावान्वये एकूण - ७२ नग खरेदीकामी ई-निविदा क्र.2022_ANMC_790587_1 अन्वये निविदा मागविल्या असता दोन्हीही वेळेस श्री.साई इंडस्ट्रीज,नाशिक यांचा वाटाघाटी नंतर स्पर्धात्मक लघुत्तम दर रुपये.१२,९३०/-फक्त प्रति १ नग याप्रमाणे प्राप्त झालेला आहे.सदरच्या दरास व खरेदीकामी येणा-या खर्चास मा.आयुक्तसाहेब यांनी दि.२०/०५/२०२२ रोजी मंजुरी दिलेली आहे

संदर्भिय प्रस्तावान्वये कास्ट आयर्न बेंन्च - ७५ नग खरेदीकामी पुनश्च ई-निविदा न मागविता उपरोक्त ई-निविदेतील प्राप्त स्पर्धात्मकदृष्टया सर्वात लघुत्तम रु.१२,९३०/- प्रति १ नग या दराने वरिल स्पेसिफिकेशन प्रमाणे खरेदीस व त्याकामी येणा-या रक्कम रुपये.९,६९,७५०=००फक्त (अक्षरी रक्कम रुपये.नऊ लक्ष एकोणसत्तर हजार सातशे पंन्नास फक्त)च्या खर्चास मा.आयुक्तसाहेब यांनी दि.०९/०६/२०२२ रोजी मंजुरी दिलेली आहे.

संबंधित निविदाकार यांना स्टोअर विभाग जा.क्र.- ११८ दि.१६/०६/२०२२ अन्वये निविदा डिपॉझिट रक्कम भरुन करारनामा करुन देणेबाबत कळविले असता त्यांनी दि.०६/०७/२०२२ रोजी निविदा डिपॉझिट रक्कम भरुन दि.०६/०७/२०२२ रोजी संविदा पूर्ण केलेली आहे.

तरी कास्ट आयर्न बेंन्च - ७५ नग खरेदी करिता केलेल्या संविदेची माहिती महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ७३ (ड) अन्वये मा.स्थायी समिती सभेपुढे माहितीस्तव सादर करणेस मंजुरी मिळावी हि विनंती.आदेशार्थ सविनय सादर.

येणे प्रमाणे स्टोअर विभाग प्रमुख यांचा अभिप्राय असे.

यावर मा.मुख्यलेखाधिकारी यांची स्वाक्षरी.

यावर मुख्यलेखापरिक्षक यांचा अभिप्राय की,स्टोअर विभाग प्रमुख यांनी प्रस्तावित केले प्रमाणे "अ" नुसार कार्यवाहीस्तव सादर.

यावर मा.उपायुक्त (कर) प्रस्तावित "अ" प्रमाणे आदेशार्थ सादर.

यावर मा.आयुक्त साहेब यांची सहमतीदर्शक स्वाक्षरी.

सबब प्रकरण मा.स्थायी समिती सभेपुढे सादर.

--**--

**<u>चर्चा -</u>**

मा.सभापती साहेब :- अहमदनगर महानगरपालिका सार्वजनिक उद्यान विभागा करिता **प्रभाग क्र.०७** मध्ये विविध ठिकाणी बसविणेसाठी Cast Iron Bench-७५नग प्रत्यक्ष ठिकाणी पुरवठा करून बसवून देणेकामी केलेल्या संविदेची महिती महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ७३(ड) अन्वये माहिती बाबतचा ऑफिस रिपोर्ट आहे.

मा.श्री.सचिन शिंदे :- आमच्या प्रभगामध्ये बाकडे मागणी बाबतचा प्रस्ताव देण्यात आलेला होता.परंतु मध्यंतरीच्या काळात त्या प्रस्तावावर कोणत्याही प्रकारची कार्यवाही केल्याचे दिसुन येत नाही.महानगरपालिका आम्हाला बाकडे देणार आहे किंवा नाही या बाबत माहिती दयावी.

श्री.जाधव,स्टोअर विभाग प्रमुख :- बाकडया बाबतचे प्रस्ताव मा.आयुक्त साहेब यांच्याकडे सादर करण्यात आलेले आहेत.मा.आयुक्त साहेब यांनी मंजुरी दिलेली नाही.

मा.सभापती साहेब :- मा.आयुक्त साहेब यांनी बाकडयांचे प्रस्ताव का स्थगीत केले. त्यावर काय अभिप्राय दिले आहे.

उपायुक्त (कर) श्री.डांगे :- बाकडयांचे प्रस्ताव सादर केलेले आहे.त्यावर निर्णय होणार आहे.आजच्या विषयाबाबत बाकडयांचे पुर्वी आदेश केलेले आहेत.

श्री.जाधव,स्टोअर विभाग प्रमुख :- विषयांकीत बाकडयांबाबत दि.६/७/२०२२ रोजी कार्यारंभ आदेश दिलेले आहेत.आदेशात कामा संदर्भात देण्यात आलेली मुदत ४५ दिवस होती.ती संपुण गेलेली आहे.मुदतीमध्ये त्यांनी माल पोहोच केलेला नाही.

मा.श्री.रविंद्र बारस्कर :- ऑफिस रिपोर्ट मधील बाकडयांबाबत दि.६/७/२०२२ रोजी कार्यारंभ आदेश दिलेले आहेत.आदेशात कामा संदर्भात देण्यात आलेली मुदत ४५ दिवस होती.ती संपुण गेलेली आहे.मुदतीमध्ये त्यांनी माल पोहोच केलेला नसल्याने कार्यारंभ आदेश रद्द करण्यात यावा.

मा.सौ.मिना चव्हाण :- या बाबतचा कार्यारंभ आदेश रद्द करण्यात यावा.

मा.सभापती साहेब :- मी माझ्या प्रभागामध्ये विविध ठिकाणी जेष्ठ नागरीकांकरीता कास्ट आयर्न बाकडे ७५ नग खरेदी करून बसविणे बाबत मागणी केली होती.या करीता सभापती स्थायी समिती शहर विकास निधी या लेखाशिर्षा अंतर्गत या बाकडयांची मागणी केली होती.माझी मागणी गेल्या सहा महिन्या पुर्वीची आहे.आजपर्यत बाकडे आलेले नसल्याने नागरीकांच्या रोषास सामोरे जावे लागत आहे. श्री.साई इंडस्ट्रीज,नाशिक निविदाकार यांना दि.६/७/२०२२ रोजी कार्यारंभ आदेश दिलेले आहेत.या आदेशामधील कामा संदर्भात देण्यात आलेली मुदत ४५ दिवस होती. ती संपुण गेलेली आहे.मुदतीमध्ये त्यांनी माल पोहोच केलेला नाही.त्यामुळे खरेदी बाबतची प्रक्रीया रद्द करण्यात यावी.व त्या ऐवजी प्रभाग क्रमांक ७ मध्ये विविध ठिकाणी आर.सी.सी.सिमेंट ९० नग बाकडे बसविण्यात यावेत. तरी कास्ट आयर्न बेंन्च - ७५ नग खरेदी करिता केलेल्या संविदेची माहिती महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ७३ (ड) अन्वये मा.स्थायी समितीने अवलोकन केले असता कास्ट आयर्न बेंन्च - ७५ नग खरेदी बाबतचा कार्यारंभ आदेश रद्द करून त्या ऐवजी आर.सी.सी.सिमेंट बाकडे -९० नग बसविण्यास ही सभा मान्यता देत आहे.

**<u>ठराव :-</u>** ऑफिस रिपोर्ट नुसार अहमदनगर महानगरपालिका सार्वजनिक उद्यान विभागा करिता **प्रभाग क्र.०७** मध्ये विविध ठिकाणी बसविणेसाठी Cast Iron Bench-७५नग प्रत्यक्ष ठिकाणी पुरवठा करून बसवून देणेकामी केलेल्या संविदेची माहिती महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ७३ (ड) अन्वये मा.स्थायी समितीने अवलोकन केले असता श्री.साई इंडस्ट्रीज,नाशिक निविदाकार यांना दि.६/७/२०२२ रोजी कार्यारंभ आदेश दिलेले आहेत.या आदेशामधील कामा संदर्भात देण्यात आलेली मुदत ४५ दिवस होती. ती संपुण गेलेली आहे.मुदतीमध्ये त्यांनी माल पोहोच केलेला नाही.त्यामुळे खरेदी बाबतची प्रक्रीया रद्द करण्यात यावी.व त्या ऐवजी प्रभाग क्रमांक ७ मध्ये विविध ठिकाणी आर.सी.सी.सिमेंट ९० नग बाकडे बसविण्यात यावेत. तरी कास्ट आयर्न बेंन्च - ७५ नग खरेदी करिता केलेल्या कास्ट आयर्न बेंन्च - ७५ नग खरेदी बाबतचा कार्यारंभ आदेश रद्द करून त्या ऐवजी आर.सी.सी.सिमेंट बाकडे -९० नग बसविण्यास ही सभा मान्यता देत आहे.

नियमानुसार पुढील कार्यवाही करण्यात यावी.

सुचक :- मा.श्री.रविंद्र बारस्कर सही/-

अनुमोदक :- मा.सौ.मिना चव्हाण सही/-

ठराव सर्वानुमते मंजुर.

सही/-
सभापती
स्थायी समिती
अहमदनगर महानगरपलिका

**अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर**
**मा.स्थायी समिती सभा क्रमांक : ०९**

**विषय क्रमांक : ९९** **दिनांक :- २७/०९/२०२२**

---

**प्रस्तावाचा विषय :-** अहमदनगर महानगरपालिका सार्वजनिक उद्यान विभागा करिता **प्रभाग क्र.११** मध्ये विविध ठिकाणी बसविणेसाठी **Cast Iron Bench**-७५नग प्रत्यक्ष ठिकाणी पुरवठा करून बसवून देणेकामी केलेल्या संविदेची महिती महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ७३(ड) अन्वये माहिती बाबतचा ऑफिस रिपोर्ट.

**प्रस्तावाचा मजकुरः-** अहमदनगर महानगरपालिका स्टोअर विभाग

उपरोक्त विषय व संदर्भास अनुसरुन विनंती रिपोर्ट की, अहमदनगर महानगरपालिका सार्वजनिक उद्यान विभागा करिता प्रभाग क्र.११ मधील विविध ठिकाणी Cast Iron Bench- ७५ नग पूरवठा करुन प्रत्यक्ष ठिकाणी बसवून देणेकामी मा.महाराष्ट्र शासन उदयोग,ऊर्जा व कामगार विभाग शासन निर्णय क्रमांक:भांखस-२०१४/ प्र.क्र.८२/ भाग-III/उदयोग-४ मादाम कामारोड, हुतात्मा राजगुरु चौक,मंत्रालय,मुंबई - ४०००३२ दिनांक.१ डिसेंबर २०१६ अन्वये शासकीय विभागांनी करावयाच्या कार्यालयीन खरेदीसाठीच्या कार्यपद्धतीची सुधारित नियमपुस्तिकेतील परिच्छेद क्र.४.१ अन्वये ई-निविदा कार्य प्रणालीचा अवलंब करुन दै.सार्वमत दि.१८/०३/२०२२ चे वर्तमानपत्रात संक्षिप्त जाहिरात तसेच **http://mahatenders. gov.in** या वेबसाईटवर जाहिर टेंडर नोटीस प्रसिध्द करुन ई-निविदा मागविल्या असता मुदतीत -

१)विधी एंटरप्रायजेस,नागपूर
२)स्काय एंटरप्रायजेस,नाशिक
३)श्री.साई इंडस्ट्रीज,नाशिक

याप्रमाणे एकूण ३ (तीन) निविदा प्राप्त झालेल्या आहेत.

उपरोक्त सर्व निविदा ग्राहय असल्याने सर्व निविदांचे व्यापारी लिफाफे उघडण्यात आलेले असून निविदादरांचा तुलनात्मक तक्ता पाहता अ.क्र.१ - Cast Iron Bench निविदेत नमुद सविस्तर स्पेसिफिकेशनचा दर रक्कम रुपये.१२,९३०=०० / प्रती १ नग हा श्री.साई इंडस्ट्रीज,नाशिक यांचा स्पर्धात्मकदृष्टया सर्वात लघुत्तम प्राप्त झालेला आहे.

स्पर्धात्मकदृष्टया सर्वात लघुत्तम निविदा दर धारक निविदाकार श्री.साई इंडस्ट्रीज,नाशिक यांना दर निगोसिएशन करिता बोलावून दि.२०/०४/२०२२ रोजी दुपारी १२.०० वाजता झालेल्या मा.प्रशासकिय खरेदी समितीच्या बैठकीत सदरच्या निविदा दराच्या तुलनात्मक तक्त्यासह संपुर्ण प्रकरण अवलोकनार्थ तथा निर्णयास्तव ठेवण्यात आले असता दर निगोसिएशनसाठी ते समक्ष उपस्थित राहु शकले नाहीत परंतू त्यांनी दर निगोसिएशनबाबतचे पत्र ई-मेल द्वारे सादर केलेले असून निविदेमध्ये दिलेल्या दरामध्ये दर कमी करण्यास असमर्थता दर्शविलेली आहे.निविदाकार श्री.साई इंडस्ट्रीज,नाशिक यांनी दर निगोसिएशन नंतर दिलेला अंतिम दर खालील तक्त्यात कॉलम क्र.५ मध्ये नमुद केलेला आहे.मुदतीत प्राप्त निविदातील स्पर्धात्मकदृष्टया सर्वात लघुत्तम दर बाजारभावाशी पडताळून दर निगोसिएशनमध्ये कमी करुन दिलेले अंतिम दर योग्य असल्याने पुरवठादार यांनी दर निगोसिएशन नंतर दिलेल्या खालील तक्त्यात कॉलम क्र.५ मध्ये नमुद दरास व सदर दराने खालील तक्त्यात कॉलम क्र.२ मध्ये नमुद अ.क्र.१ - Cast Iron Bench - ७५ नग त्यांचेकडून खरेदी करुन

प्रत्यक्ष ठिकाणी पोहोच पूरवठा करुन बसवून घेणेस व सदरकामी येणा-या रक्कम रुपये.९,६९,७५०=०० फक्त (अक्षरी रक्कम रुपये.नऊ लक्ष एकोणसत्तर हजार सातशे पंन्नास फक्त)च्या खर्चास तसेच निविदा मंजुरीनंतर करण्यात येणा-या संविदेची माहिती महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ७३ (ड) अन्वये मा.स्थायी समिती सभेपुढे माहितीस्तव सादर करण्यास मंजुरी देणेबाबत शिफारस मा.प्रशासकिय खरेदी समितीमार्फत करण्यात आलेली आहे.

| अ क्र | साहित्याचा तपशिल | परिमाण | ई-निविदामध्ये स्पर्धात्मक दृष्टया प्राप्त लघुत्तम दर | दर वाटाघाटी नंतर दिलेला अंतिम दर | खरेदीकामी येणारा एकूण खर्च रक्कम रुपये. |
|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ |
| १) | **<u>कास्ट आयर्न बेंचचा तपशील -</u>**<br>**<u>Providing & Fixing Cast Iron Bench - Technical Specification</u>**<br>**• FRP 'C' channel wood finish Patti : C -** Section FRP channel strip of thickness up to 6 mm and 1200 mm long with minimum 8 nos wooden finish bolted to both the side frames.The seating portion and backrest is made up of FRP.At the end of the strips nylon end caps are given to prevent dust particles from entering in it.<br>**• FRP product :** All the Fiber Reinforced Plastics (FRP) materials are processed by the hand laid process which is considered to be the best of its type.We use international quality of Gel coats which is duly mixed with U.V.stabilized pigment to give the required colour to the product.Thickness of the FRP material varies from 4 mm to 6 mm as per the product.<br>**• Bench frame :** I-section bench frame with bend welded on one side for bolting the FRP C-Channel strip.The Bench frame thickness shall be 30 mm approx.made up of cast iron is sand casting process.<br>**• Powder Coating :** It shall be done with pure polyester raw material.Dry film Thickness maintained within the range of 50-70 microns.<br>**• Nut and Bolts :** Galvanized / S.S.& Nuts / Nylon Lock Nuts are used with PVC Bolt Caps.All open ends of pipe been closed by GI/PVC caps for user safety against entrapment The overall **Weight** of bench shall be **55 kg** approx.Normal Seat Height of bench shall be 18" approx from ground level. The legs pipes are embedded in | ७५ नग | रु.१२९३०=०० / प्रती १ नग | रु.१२९३०=०० / प्रती १ नग | ९६९७५०=०० |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | C.C.Blocks (M20 mix)of size 0.45 x 0.45 x 0.45.<br>Descriptions :<br>• **Product Area :** 1.2m x 0.6m (4ft x 2ft) Approx<br>• **Capacity :** 3 Adult<br><br>कास्ट आयर्न बेंच उद्यान विभाग प्रमुख यांचे सुचनेप्रमाणे प्रत्यक्ष ठिकाणी पोहोच पुरवठा करुन बसवून देणेसह | | | | |

तरी मा.प्रशासकिय खरेदी समितीने केलेल्या शिफारशी प्रमाणे श्री.साई इंडस्ट्रीज,नाशिक यांनी दर निगोसिएशन नंतर दिलेल्या उपरोक्त तक्त्यात कॉलम क्र.५ मध्ये नमुद दरास व सदर दराने कॉलम क्र.२ मध्ये नमुद सविस्तर स्पेसिफिकेशन प्रमाणे अ.क्र.१ - Cast Iron Bench - ७५ नग त्यांचेकडून खरेदी करुन प्रत्यक्ष ठिकाणी बसवून घेणेस व सदरकामी येणा-या रक्कम रुपये.९,६९,७५०=०० फक्त (अक्षरी रक्कम रुपये.नऊ लक्ष एकोणसत्तर हजार सातशे पंन्नास फक्त) च्या खर्चास मंजुरी मिळावी तसेच निविदा मंजुरीनंतर करण्यात येणा-या संविदेची माहिती महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ७३ (ड) अन्वये मा.स्थायी समिती सभेपुढे माहितीस्तव सादर करण्यास मंजुरी मिळावी हि विनंती.आदेशार्थ सविनय सादर.

येणे प्रमाणे स्टोअर विभाग प्रमुख यांचा अहवाल असे.

यावर मा.मुख्यलेखाधिकारी यांची स्वाक्षरी.

यावर मा.मुख्यलेखापरिक्षक यांचा अभिप्राय की,स्टोअर विभाग प्रमुख यांनी प्रस्तावित केले प्रमाणे "अ" नुसार कार्यवाहीस्तव.

यावर मा.सहाय्यक आयुक्त साहेब यांचा अभिप्राय की,प्रस्तावित "अ" "ब" "क" प्रमाणे आदेशार्थ सादर.

यावर मा.उपायुक्त (कर) यांचा अभिप्राय की, "अ" प्रमाणे मान्यतेस सादर.

यावर मा.आयुक्त साहेब यांची सहमतीदर्शक स्वाक्षरी.

सबब प्रकरण मा.स्थायी समिती सभेपुढे सादर.

--**--

**<u>चर्चा :-</u>**

मा.सभापती साहेब :- अहमदनगर महानगरपालिका सार्वजनिक उद्यान विभागा करिता **प्रभाग क्र.११** मध्ये विविध ठिकाणी बसविणेसाठी **Cast Iron Bench**-७५नग प्रत्यक्ष ठिकाणी पुरवठा करून बसवून देणेकामी केलेल्या संविदेची महिती महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ७३(ड) अन्वये माहिती बाबतचा ऑफिस रिपोर्ट आहे.

मा.श्री.रविंद्र बारस्कर :- ऑफिस रिपोर्ट वाचून दाखवा.

त्यानुसार सभेमध्ये ऑफिस रिपोर्टचे वाचन करण्यात आले.

मा.श्री.रविंद्र बारस्कर :- महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ७३(ड) अन्वये माहिती अवलोकन झाली आहे.ऑफिस रिपोर्ट मंजुर.

मा.सौ.मिना चव्हाण :- माहिती मा.स्थायी समितीस अवलोकन झाली आहे.ऑफिस रिपोर्ट मंजुर.

मा.सभापती साहेब :- अहमदनगर महानगरपालिका सार्वजनिक उद्यान विभागा करिता **प्रभाग क्र.११** मध्ये विविध ठिकाणी बसविणेसाठी **Cast Iron Bench**-७५नग प्रत्यक्ष ठिकाणी पुरवठा करून बसवून देणेकामी केलेल्या संविदेची महिती महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ७३(ड) अन्वये अवलोकन झाले आहे.ऑफिस रिपोर्ट मंजुर.

**<u>ठराव :-</u>** ऑफिस रिपोर्ट नुसार अहमदनगर महानगरपालिका सार्वजनिक उद्यान विभागा करिता **प्रभाग क्र.११** मध्ये विविध ठिकाणी बसविणेसाठी **Cast Iron Bench**-७५नग प्रत्यक्ष ठिकाणी पुरवठा करून बसवून देणेकामी केलेल्या संविदेची महिती महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ७३(ड) अन्वये अवलोकन झाले आहे.ऑफिस रिपोर्ट मंजुर.नियमानुसार पुढील कार्यवाही करण्यात यावी.

सुचक :- मा.श्री.रविंद्र बारस्कर सही/-

अनुमोदक :- मा.सौ.मिना चव्हाण सही/-

ठराव सर्वानुमते मंजुर.

सही/-
सभापती
स्थायी समिती
अहमदनगर महानगरपालिका

**विषय क्रमांक : १००** **दिनांक :- २७/०९/२०२२**

---

**प्रस्तावाचा विषय :-** अहमदनगर महानगपालिकेच्या पावसाळयापुर्वी महानगरपालिका हद्दीतील ओढे,नाले ,नदिपात्र इत्यादींची साफसफाई करिता पोकलेन,जे.सी.बी मशिन ,डंपर इत्यादी वाहने भाडेतत्वावर लावुन साफसफाई करणे करिता वाढीव खर्चास मान्यता मिळणे बाबतचा ऑफिस रिपोर्ट.

**प्रस्तावाचा मजकुरः-** अहमदनगर महानगरपालिका अतिक्रमण विभाग

उपरोक्त मान्यतेनुसार जा.क्र.७२ दि.२६/०५/२०२२ अन्वये श्री.धाडगे यांना कार्यारंभ आदेश देण्यांत आलेला आहे व त्यानुसार शहरातील ओढे, नाले व नदिपात्रातील अडथळे हटविण्यांची कामे सुरु करण्यांत आलेली आहेत.

सद्यस्थितीत शहरातील ओढे, नाले स्वच्छ करण्याचे बहुतांश काम पुर्ण झालेले आहे. परंतु नदिपात्रातील काही ठिकाणाचे, ओढ्याचे व गाळ उचलण्याचे काही काम अद्याप शिल्लक राहिलेले आहे. दरवर्षी होणा-या कामा पेक्षा अतिरिक्त काम ह्या वेळेस झालेले आहे. यामध्ये बोल्हेगाव परिसरातील नदीचे पात्र रुंदी करणाचे काम स्थायी समिती सभापती श्री.वाकळे यांचे निर्देशानुसार व विभाग प्रमुख यांनी सांगीतल्या प्रमाणे करण्यांत आलेले आहे. तसेच वारुळाचा मारुती सिनानदी पुल येथे ही अचाणकपणे पावसाच्या पाण्याने मोठ्या प्रमाणात पानगवत आल्याने ते सुध्दा तातडीने काढून घेण्यांत आलेले आहे.

वरील प्रमाणे काम ज्यादा झाल्याने दि.२७/६/२०२२ पर्यंत अंदाजे एकुण रु.२३,०७,१९०/- इतका खर्च अपेक्षीत आहे. अहवालातील मंजुर अंदाजीत खर्च रक्कम रु.२४,१७,३००/- इतका आहे.

सद्यस्थितीत नदिपात्र व काही ठिकाणाचे गाळ उचलण्याचे, ओढ्याचे पात्र इत्यादी काम शिल्लक आहे. त्याकरिता अंदाजे रक्कम रु.१०,००,०००/- इतका वाढीव खर्च अपेक्षीत आहे. सध्या पावसाळयाचे दिवस असल्याने उर्वरीत नदीपात्र व काही ओढ्याचे पात्र तातडीने स्वच्छ करुन घेणे आवश्यक आहे. तरी त्या करीता वरील मंजुर खर्चा व्यतिरिक्त वाढीव रुपये १०,००,०००/- च्या खर्चास मंजुरी मिळणे करीता अहवाल सादर.

लेखाशिर्षक मनपा हद्दीतील सिनानदी ओढे नाले साफ सफाई करणे. सन २०२२-२०२३

अंदाजपत्रकीय तरतुद :- ४५,००,०००/-

प्रथम मंजुर अहवालातील अंदाजीत खर्च :- २३,३७,४३०/-

अद्याप पर्यंत झालेला खर्च :- निरंक (अद्याप बील दिलेले नाही.)

अतिरिक्त वाढ़ीव खर्चाची अपेक्षीत रक्कम :- रु.१०,००,०००/-

एकुण मंजुर अहवालातील रक्कम + वाढीव रक्कम :- ३१,६२,५७०/-

एकुण उपलब्ध तरतुदी मधुन उपलब्ध शिल्लकः- १३,३७,४३०/-

तरी वरील प्रमाणे पावसाळी ओढे, नाले, नदिपात्र स्वच्छतेच्या सुरु करण्यांत आलेल्या कामा करीता वाढीव रुपये १०,००,०००/- च्या खर्चास मंजुरी मिळणेस्तव अहवाल सादर.

आता पर्यंत झालेल्या कामाचा तपशील सोबत जोडलेला आहे.

यावर मा.विभाग प्रमुख यांचा अभिप्राय की,उपरोक्त अहवालान्वे व उर्वरित कामासाठी व पाऊसाचे दिवस संपेपर्यंत तातडीचे कामासाठी मान्यता देणे संयुक्तिक वाटते.

यावर सहाय्यक संचालक नगररचना यांची सहमती दर्शक स्वाक्षरी

यावर मुख्यलेखाधिकारी यांचा अभिप्राय की, वाढीव चर्चाबाबत आदेशार्थ सादर.

यावर सहायक लेखापरिक्षक/मुख्यलेखापरिक्षक यांचा अभिप्राय की, १) मुळ प्रशासकीय निविदा २४ लक्ष असल्याने प्रस्तावात नमुद केलेला वाढ़ीव खर्च हा १० लक्ष असा एकुण ३४ लक्ष खर्च अपेक्षित असल्याने महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ मधील नियम ७३ (क) नुसार मा.स्थायी समितीच्या मंजुरी करिता पाठविणे

निर्णयास्तव सादर. २) झालेले काम निविदा अटी व शर्तीप्रमाणे व तपशीलवार झाले असल्याबाबत विभागाने खात्रीकरुन प्रस्तावीत "अ"नुसार निर्णयास्तव सादर..

यावर मा.उपायुक्त (सा) यांचा अभिप्राय की, मुलेप यांचे अभिप्रायानुसार मुद्दा क्र.०१ नुसार वाढावे खर्चासाठी मा.स्थायी समितीसमोर पाठविण्यास निर्णयास्तव व मुद्दा क्र.०२ नुसार बिले अदा करतांना नगररचना विभागाकडून प्रत्यक्ष झालेल्या कामानुसार देयक अदा करणेस आदेशार्थ सादर.

यावर मा.आयुक्त साहेब यांची अभिप्राय की, यथा प्रस्तावित मान्य स्वाक्षरी.

सबब प्रकरण मा.स्थायी समिती सभेपुढे सादर.

--**--

**चर्चा :-**

मा.सभापती साहेब :- अहमदनगर महानगपालिकेच्या पावसाळयापुर्वी महानगरपालिका हद्दीतील ओढे,नाले ,नदिपात्र इत्यादींची साफसफाई करिता पोकलेन,जे.सी.बी मशिन ,डंपर इत्यादी वाहने भाडेतत्वावर लावुन साफसफाई करणे करिता वाढीव खर्चास मान्यता मिळणे बाबतचा ऑफिस रिपोर्ट.

मा.श्री.समद खान :- ऑफिस रिपोर्ट वाचून दाखवा.

त्यानुसार सभेमध्ये ऑफिस रिपोर्टचे वाचन करण्यात आले.

मा.सभापती साहेब :- या बाबत माहिती सांगा.

अतिक्रमण विभाग प्रमुख श्री.सातपुते :- महानगरपालिका हद्दीतील ओढयांमधील गाळ काढणे कामी टेंडर काढण्यात आले होते.त्यानुसार नाले साफ सफाईचे काम झाले आहे.मंजुरी मिळालेल्या बजेटनुसार काम झालेले आहे.सध्या पावसाळयाचे दिवस असल्याने काही भागामध्ये पावसाचे पाणी साठुन नागरीकांच्या घरामध्ये पाणी जात आहे.या कामाकरीता तसेच शहरातील काही ठिकाणी नाले सफाई करणे बाकी असल्याने आजचा प्रस्ताव ठेवण्यात आलेला आहे.

तसेच या पुढे पावसाळा संपेपर्यत जे.सी.बी.वगैरे मशिनरी लागणार आहे.ज्या ठिकाणी मशिनव्दारे काम करतायेईल तेथे बांधकाम विभागामार्फत काम करण्यात येते.ज्या ठिकाणी मशिन जाणार नाही तेथे मनुष्य यंत्रणे मार्फत आरोग्य विभागाने काम करून घेणे आवश्यक आहे.

मा.श्री.गणेश कवडे :- ऑफिस रिपोर्ट मंजुर करण्यात यावा.

मा.सौ.रुपाली वारे :- माझ्या प्रभागातील ओढे नाले साफ सफाईचे काम यंत्रा व्दारे होत नसल्याने कामगारांच्या र्माफत करून घेण्यात यावे.ऑफिस रिपोर्ट मंजुर करण्यात यावा.

मा.सभापती साहेब :- नाले सफाई करिता टेंडर मध्ये जे.सी.बी. मशीन ऐवजी एल.आर.मशिन ची मागणी करा.

अहमदनगर महानगपालिकेच्या पावसाळयापुर्वी महानगरपालिका हद्दीतील ओढे,नाले ,नदिपात्र इत्यादींची साफसफाई करिता पोकलेन,जे.सी.बी मशिन ,डंपर इत्यादी वाहने भाडेतत्वावर लावुन साफसफाई करणे करिता वाढीव कामा करीता रुपये १० लाखा च्या खर्चास मान्यता देण्यात येत आहे.

**ठराव :-** ऑफिस रिपोर्ट नुसार अहमदनगर महानगपालिकेच्या पावसाळयापुर्वी महानगरपालिका हद्दीतील ओढे,नाले ,नदिपात्र इत्यादींची साफसफाई करिता पोकलेन,जे.सी.बी मशिन ,डंपर इत्यादी वाहने भाडेतत्वावर लावुन साफसफाई करणे करिता वाढीव काम करीता रुपये १० लाखा च्या खर्चास मान्यता देण्यात येत आहे.ऑफिस रिपोर्ट मंजुर.खर्च मंजुर.

कायदेशीर व नियमानुसार पुढील कार्यवाही करण्यात यावी.

सुचक :- मा.श्री.गणेश कवडे सही/-

अनुमोदक :- मा.सौ.रूपाली वारे सही/-

ठराव सर्वानुमते मंजुर.

सही/-
सभापती
स्थायी समिती
अहमदनगर महानगरपालिका

## अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर
## मा.स्थायी समिती सभा क्रमांक : ०९

**विषय क्रमांक : १०१** **दिनांक :- २७/०९/२०२२**

---

**प्रस्तावाचा विषय :-** अहमदनगर महानगरपालिका नाविन्यपुर्ण योजना सन २०२१-२२ ई -निविदा क्र.७८९४५८ या निविदे अंर्तगत अहमदनगर महानगरपालिका हद्दीतील प्रभाग क्र.१४ मधील बुरूडगांव रोड येथील गट क्रमांक ३६३/१ व २ व ३ व ४/३६४/१ ब २/२३६५ / ३६६/१ व २ व ३/३६७ ओपनस्पेसमधील साईनगर उद्यानामध्ये म्युझिकल गार्डन विकसित करणे या कामाची निविदा मंजुरी बाबत ऑफिस रिपोर्ट.

**प्रस्तावाचा मजकुर:-** अहमदनगर महानगरपालिका बांधकाम विभाग

उपरोक्त विषयान्वये खालील प्रमाणे अहवाल सादर करण्यात येत आहे.

१.प्रशासकिय मान्यता :- मा.जिल्हाधिकारी,अ.नगर दि.०२/०३/२०२२
२.ई - निविदा क्रमांक ७८९४५८/सन २०२२-२३ दि.१२/०४/२०२२
३.निविदा विक्री कालावधी:- दि.१२/०४/२०२२ ते दि.०६/०५/२०२२
४.निविदा स्विकारणेची दिनांक :- दि.१२/०४/२०२२ ते दि.०६/०५/२०२२
५.निविदा उघडणेचा दिनांक :- दि.०९/०५/२०२२
६.कामाची मुदत :- ०६ महिने
७. प्राप्त झालेल्या निविदेचा तपशिल :- दि.०२/०८/२०२२ रोजीच्या मा.छाननी समितीचे शिफारशीनुसार.

| ई - निविदा क्रमांक | कामाचे नांव | निविदा रक्कम | निविदा दाखल करणारे ठेकेदार | निविदेमध्ये भरलेला दर(निविदा दरापेक्षा) | सर्वात कमी दराचे निविदाधारक व त्यांचा दर |
|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ |
| ७८९४५८ | अहमदनगर महानगरपालिका हद्दीतील प्रभाग क्र.१४मधील बुरूडगांव रोड येथील गट क्रमांक ३६३/१ व २व३व ४/३६४/१ब२/२३६५/३६६/१ व २ व३/३६७ या ओपनस्पेसमध्ये साईनगर उद्यानमध्ये म्युझिकल गार्डन विकसित करणे | १,०६,०९,६१४ | रोहित रत्ना अंधारे अहमदनगर | निविदा दरापेक्षा ५.००%जादा दराने | रोहित रत्ना अंधारे अहमदनगर |
| | | | श्री.चेतन मारूती जाधव अहमदनगर | निविदा दरापेक्षा १२.००% जादा दराने | निविदा दराने |

वरील रकाना क्र.६ मध्ये नमुद निविदाधारक रोहीत रत्ना अंधारे अहमदनगर,यांची सदरची निविदा निविदा दरापेक्षा ५.००% जादा दराने अलेली असून .सदर निविदा सर्वात कमी दराची आहे.तथापि सदर निविदाधारकाने संदर्भ क्र.२ अन्वये सदरचे काम निविदा दराने करणेस तयार असलेबाबत इकडेस कळविले आहे.

तरी श्री.रोहीत रत्ना अंधारे अहमदनगर यांनी दिलेल्या पत्रानुसार सदरचे काम निविदा दराने मंजूर करणेस्तव ऑफिस रिपोर्ट मा.स्थायी समितीकडेस पाठविणेसआदेशार्थ सविनय सादर.

येणे प्रमाणे उप अभियांता यांचा अहवाल असे.

यावर मा.शहर अभियंता यांचा अभिप्राय की,वरील "अ" प्रमाणे विषयांकीत निविदा निर्णयार्थ मा.स्थायी समितीसमोर सादर करणे योग्य.आदेशार्थ सादर.

यावर मुख्यलेखाधिकारी यांची स्वाक्षरी.

यावर मा.मुख्यलेखापरिक्षक यांचा अभिप्राय की,महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम (सुधारीत) मधील प्रकरण ७ नियम ७३(क) प्रमाणे निविदा दराची निविदा कार्यवाहीस्तव सादर.

यावर मा.सहाय्यक आयुक्त यांचा अभिप्राय की, प्रस्तावित"अ" "ब" प्रमाणे मान्यतेस सादर..

यावर मा.उपायुक्त (सा) यांचा अभिप्राय की,प्रस्तावित"अ" "ब" "क" "ड" व "इ" मधील अभिप्रायानुसार मा.स्थायी समितीसमोर निविदा दराची निविदा निर्णयासाठी ठेवण्यास मान्यतेस्तव सादर.

यावर मा.आयुक्त साहेब यांचा अभिप्राय की, "अ" नुसार मान्य.

सबब प्रकरण मा.स्थायी समिती सभेपुढे सादर.

--**--

**चर्चा :-**

मा.सभापती साहेब :- अहमदनगर महानगरपालिका नाविन्यपुर्ण योजना सन २०२१-२२ ई -निविदा क्र.७८९४५८ या निविदे अंर्तगत अहमदनगर महानगरपालिका हद्दीतील प्रभाग क्र.१४ मधील बुरूडगांव रोड येथील गट क्रमांक ३६३/१ व २ व ३ व ४/३६४/१ ब २/२३६५ / ३६६/१ व २ व ३/३६७ ओपनस्पेसमधील साईनगर उद्यानामध्ये म्युझिकल गार्डन विकसित करणे या कामाची निविदा मंजुरी बाबत ऑफिस रिपोर्ट.

मा.श्री.परशराम गायकवाडः- ऑफिस रिपोर्ट वाचून दाखवा.

त्यानुसार सभेमध्ये ऑफिस रिपोर्टचे सभेमध्ये वाचन करण्यात आले.

मा.सभापती साहेब :- कार्यसम्राट आमदार मा.श्री.संग्रामभैय्या जगताप यांच्या संकल्पनेतुन हा विषय घेण्यात आलेला आहे.नगरशहरामध्ये इतर शहरामधील आपल्याकडे कोणी बाहेरगांवचे पाहुणे आले,नगरशहरास भेट देण्या करीता आले तर पुणे- मुंबई सारखे शहरामध्ये मनोरंजनाची ठिकाणे नाहीत.मोठया शहरांच्या धर्तीवर आपल्या शहरामध्ये चांगला उपक्रम हाती घेण्यात आलेला आहे त्याबद्दल मी मा.स्थायी समिती च्या वतीने मा.आ.संग्रामभैय्या जगताप यांचे आभार व्यक्त करतो.

मा.श्री.समद खान :- ऑफिस रिपोर्ट मंजुर करण्यात यावा.

मा.सौ.मिना चव्हाण :- ऑफिस रिपोर्ट मंजुर करण्यात यावा.

मा.सभापती साहेब :- अहमदनगर महानगरपालिका नाविन्यपुर्ण योजना सन २०२१-२२ ई -निविदा क्र.७८९४५८ या निविदे अंर्तगत अहमदनगर महानगरपालिका हद्दीतील प्रभाग क्र.१४ मधील बुरूडगांव रोड येथील गट क्रमांक ३६३/१ व २ व ३ व ४/३६४/१ ब २/२३६५ / ३६६/१ व २ व ३/३६७ ओपनस्पेसमधील साईनगर उद्यानामध्ये म्युझिकल गार्डन विकसित करणे या कामाचे निविदाधारक रोहीत रत्ना अंधारे अहमदनगर,यांची निविदा दराची निविदेस मान्यता देण्यात येत आहे.

**ठराव :-** ऑफिस रिपोर्ट नुसार अहमदनगर महानगरपालिका नाविन्यपुर्ण योजना सन २०२१-२२ ई -निविदा क्र.७८९४५८ या निविदे अंर्तगत अहमदनगर महानगरपालिका हद्दीतील प्रभाग क्र.१४ मधील बुरूडगांव रोड येथील गट क्रमांक ३६३/१ व २ व ३ व ४/३६४/१ ब २/२३६५ / ३६६/१ व २ व ३/३६७ ओपनस्पेसमधील साईनगर उद्यानामध्ये म्युझिकल गार्डन विकसित करणे या कामाचे निविदाधारक रोहीत रत्ना अंधारे अहमदनगर,यांची निविदा दराच्या निविदेस मान्यता देण्यात येत आहे.ऑफिस रिपोर्ट मंजुर.खर्च मंजुर. कायदेशीर व नियमानुसार पुढील कार्यवाही करण्यात यावी.

सुचक :- मा.श्री.समद खान सही/-

अनुमोदक :- मा.सौ.मिना चव्हाण सही/-

ठराव सर्वानुमते मंजुर.

सही/-
सभापती
स्थायी समिती
अहमदनगर महानगरपलिका

**अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर**

**मा.स्थायी समिती सभा क्रमांक : ०९**

**विषय क्रमांक : १०२** **दिनांक :- २७/०९/२०२२**

---

**प्रस्तावाचा विषय :-** अहमदनगर महानगरपालिका मा.खासदार स्थानिक विकास कार्यक्रम सन २०२२-२३ई - निविदा क्र.८०१२५८अंतर्गत अहमदनगर महानगरपालिका हद्दीतील लालटाकी रोड,रेसीडेन्सी हायस्कुल भवन बांधणे व पेव्हिंग ब्लॉक बसविणे बाबतचा ऑफिस रिपोर्ट.

**प्रस्तावाचा मजकुरः-** अहमदनगर महानगरपालिका बांधकाम विभाग

उपरोक्त विषयाबाबत खालीलप्रमाणे अहवाल सादर करण्यात येत आहे.

१. प्रशाससकीय मान्यता :- मा.जिल्हाधिकारी, अ,नगर ००४५ दि. २२९/०४/२०२२

२. ई-निविदा क्रमांक ८०१२५८ / सन २०२२-२३ दि.२३/०५/२०२२

३.निविदा विक्री कालावधी:- दि.२४/०५/२०२२ ते दि.०७/०५/२०२२

४.निविदा स्विकारणेची दिनांक :- दि.२४/०५/२०२२ ते दि.०७/०५/२०२२

५.निविदा उघडणेचा दिनांक :- दि.०९/०६/२०२२

६.कामाची मुदत :- ०६ महिने

७. प्राप्त झालेल्या निविदेचा तपशिल :- दि.२५/०८/२०२२ रोजीच्या मा.छाननी समितीचे शिफारशीनुसार.

| ई - निविदा क्रमांक | कामाचे नांव | निविदा रक्कम | निविदा दाखल करणारे ठेकेदार | निविदेमध्ये भरलेला दर(निविदा दरापेक्षा) | सर्वात कमी दराचे निविदाधारक व त्यांचा दर |
|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ |
| ८०१२५८ | अहमदनगर महानगरपालिका हद्दीतील लालटाकी रोड, रेसीडेंन्सील हायस्कूल समोर सांस्कृतीक भवन बांधणे व पेव्हींग ब्लॉक बसविणे | २६,२९,१६६/- | श्री.सचिन बाबासाहेब सापते, अहमदनगर | निविदा दराने | श्री.सचिन बाबासाहेब सापते, अहमदनगर |
| | | | श्री.आंबादास रामदास चौधरी अहमदनगर | निविदा दरापेक्षा १.८१०% जादा दराने | निविदा दराने |

वरील रकाना क्र.६ मध्ये नमुद निविदाधारक सचिन बाबासाहेब सापते, अहमदनगर,यांची सदरची निविदा निविदा दराने सदरची निविदा सर्वात कमी दराची आहे.

तरी श्री.सचिन बाबासाहेब सापते अहमदनगर यांची सर्वात कमी दराची निविदा दराने आलेली निविदा मंजूरीस्तव मा.स्थायी समितीकडे पाठविणेस ऑफिस रिपोर्ट सविनय सादर.

येणे प्रमाणे उप अभियांता यांचा अहवाल असे.

यावर मा.शहर अभियंता यांचा अभिप्राय की,वरील प्रमाणे निविदादराची निविदा निर्णयार्थ मा.स्थायी समितीकडेस सादर करणे योग्य.आदेशार्थ सादर.

यावर मुख्यलेखाधिकारी यांची स्वाक्षरी.

यावर मा.मुख्यलेखापरिक्षक यांचा अभिप्राय की,महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ मधील नियम ७३(क) नुसार कार्यवाही करुन निविदाकार यांची निविदा दराची निविदा कार्यवाहीस्तव.

यावर मा.सहाय्यक आयुक्त यांचा अभिप्राय की, प्रस्तावित"अ" "ब" प्रमाणे मान्यतेस सादर..

यावर मा.उपायुक्त (सा) यांचा अभिप्राय की,प्रस्तावित केल्यानुसार निविदादराची निविदा निर्णयासाठी मा.स्थायी समितीसमोर ठेवण्यास मान्यतेस्तव सादर.

यावर मा.आयुक्त साहेब यांची सहमती दर्शक स्वाक्षरी.

सबब प्रकरण मा.स्थायी समिती सभेपुढे सादर.

**चर्चा :-**

मा.सभापती साहेब :- अहमदनगर महानगरपालिका सन २०२२-२३ई - निविदा क्र.८०१२५८अंतर्गत अहमदनगर महानगरपालिका हद्दीतील लालटाकी रोड,रेसीडेन्सी हायस्कुल भवन बांधणे व पेव्हिंग ब्लॉक बसविणे या कामाची निविदा मंजुरी बाबत ऑफिस रिपोर्ट.

मा.श्री.राहुल कांबळे:- ऑफिस रिपोर्ट वाचून दाखवा.

त्यानुसार सभेमध्ये ऑफिस रिपोर्टचे सभेमध्ये वाचन करण्यात आले.

मा.सभापती साहेब :- सदर विषयाबाबत माहिती देण्यात यावी.

शहर अभियंता श्री.इथापे :- रेसिडेन्सीअल हायस्कुल समोरील पोलिस हेडक्वॉर्टर परिसरातील जागेमध्ये वाचनालय समाधी पुतळा व जागेला संरक्षण भिंत बांधणे आहे.सदर कामा करीता खा.छत्रपती संभाजीराजे,राज्य सभासदस्य यांनी निधी उपलब्ध करून दिलेला आहे.त्यानिधी मधुन सदर ठिकाणी सुशोभिकरणाचे व इतर कामे करण्यात येणार आहे.

मा.सभापती साहेब :- महाराष्ट्रातील बहुजन वर्गाकरीता छत्रपती संभाजीराजे यांचे मोठे योगदान आहे.बहुजनांच्या कल्याणाकरीता त्यांनी सदरची जागा दिलेली आहे.अहमदनगर शहरातील विकास कामा करीता निधी उपलब्ध करून दिल्याबद्दल मा.स्थायी समिती सदस्य व महानगरपालिकेच्या वतीने मी त्यांचे आभार व्यक्त करतो.तसेच छत्रपती शिवाजी महाराज,भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर तसेच क्रांतीज्योती महात्मा फुले यांचा पुतळा बसविणे बाबत बांधकाम कार्यवाही करण्यात यावी.छत्रपती शिवाजी महाराजांचे वंशज चौथे शिवाजी महाराज यांच्या पदस्पर्शाने पावन झालेली ही भुमी आहे.छत्रपती शिवाजी महाराजांच्या वंशजांनी नगरवासीयांना कायमच मोठया प्रमाणात मदत केली आहे.पुर्वीच्या काळामध्ये शहराच्या भोवतालील ग्रामीण भागामधील विद्यार्थना शैक्षणीक सुविधा उपलब्ध नव्हती.बहुजन समाज शिक्षणापासुन वंचीत होता.त्या काळी मराठा विदयाप्रसारक समाज या संस्थेच्या माध्यमातुन ग्रामीण भागातील विदयार्थ्याकरीता सध्याच्या न्यु आर्ट कॉमर्स ॲण्ड सायन्स या विदयालयाची जागा उपलब्ध करून दिली आहे.पुर्वीच्या काळी या ठिकाणी वसतीगृह सुध्दा होते.मोफत जेवणाची व राहण्याची सुविधा होती.त्यामुळे शहरातील तसेच ग्रामीण भागातील विदयार्थी या संस्थेमध्ये शिक्षण घेवून डॉक्टर,वकील,शैक्षणीकक्षेत्रात उच्चपदावरील सरकारी अधिकारी तसेच राजकारणामध्ये आज देशामध्ये त्यांनी नावलौकीक कमावले आहे.पुन्हा एकदा खा.छत्रपती संभाजीराजे,राज्य सभासदस्य यांनी या कामा करीता निधी उपलब्ध करून दिल्याबद्दल त्यांचे आभार व्यक्त करतो.त्यांचे असेच प्रेम या शहरावर राहिल याची मला खात्री आहे.

शहर अभियांता श्री.इथापे :- शहरातील बसविण्यात येणा-या पुतळया बाबत मागील सभेमध्ये चर्चा झाली होती.त्या चर्चेनुसार मा.जिल्हाधिकारी यांचे सोबत चर्चा झालेली आहे.पुतळे बसविणे बाबतचा प्रस्ताव मा.जिल्हा पोलीस अधिक्षक यांचे कडे दिलेला होता.परंतु ते ना हरकत प्रमाणपत्र देत नाहीत.त्यांच्या म्हणण्यानुसार पुतळयांबाबतचा प्रस्ताव प्रथमतःमा.जिल्हाधिकारी ,अहमदनगर यांचेकडे सादर करण्यात यावा.तद्नंतर त्यांचे मार्फत प्रस्ताव आमच्या कार्यालयाकडे येईल.त्यांच्या सुचने नुसार प्रस्ताव सादर केलेला आहे.त्यांच्या निर्णयानुसार कार्यवाही केलेली आहे.

मा.श्री.गणेश कवडे :- ऑफिस रिपोर्ट मंजुर करण्यात यावा.

मा.सौ.रूपाली वारे :- ऑफिस रिपोर्ट मंजुर करण्यात यावा.

मा.सभापती साहेब :- अहमदनगर महानगरपालिका सन २०२२-२३ई - निविदा क्र.८०१२५८अंतर्गत अहमदनगर महानगरपालिका हद्दीतील लालटाकी रोड,रेसीडेन्सी हायस्कुल भवन बांधणे व पेव्हिंग ब्लॉक बसविणे या कामाचे निविदाधारक श्री.सचिन बाबासाहेब सापते, अहमदनगर,यांची निविदा दराची निविदेस मान्यता देण्यात येत आहे.

**ठराव :-** ऑफिस रिपोर्ट नुसार मा.खासदार स्थानिक विकास निधी कार्यक्रम,अहमदनगर महानगरपालिका सन २०२२-२३ ई - निविदा क्र.८०१२५८अंतर्गत अहमदनगर महानगरपालिका हद्दीतील लालटाकी रोड,रेसीडेन्सी हायस्कुल भवन बांधणे व पेव्हिंग ब्लॉक बसविणे या कामाचे निविदाधारक श्री.सचिन बाबासाहेब सापते, अहमदनगर,यांची निविदा दराच्या निविदेस मान्यता देण्यात येत आहे.ऑफिस रिपोर्ट मंजुर.खर्च मंजुर. कायदेशीर व नियमानुसार पुढील कार्यवाही करण्यात यावी.

सुचक :- मा.श्री.गणेश कवडे सही/-

अनुमोदक :- मा.सौ.रूपाली वारे सही/-

ठराव सर्वानुमते मंजुर.

सही/-
सभापती
स्थायी समिती
अहमदनगर महानगरपलिका

**अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर**
**मा.स्थायी समिती सभा क्रमांक : ०९**

**विषय क्रमांक : १०३** **दिनांक :- २७/०९/२०२२**

---

**प्रस्तावाचा विषय :-** अहमदनगर महानगरपालिका फेर ई नि.क्र.८१९५७६ अहमदनगर महानगरपालिका सन २०२२-२३ करीता अहमदनगर महानगरपालिका हद्दीतील गटर/ड्रेनेज/चेंबर दुरूस्ती कामाकरीता वार्षिक निविदा मंजुरी बाबत ऑफिस रिपोर्ट.(प्रभाग समिती क्र.२ करिता)

**प्रस्तावाचा मजकुर:-** अहमदनगर महानगरपालिका बांधकाम विभाग

उपरोक्त विषयान्वये खालील प्रमाणे अहवाल सादर करण्यात येत आहे.

१.प्रशासकिय मान्यता :- मा.आयुक्त यांची दि.१९/०५/२०२२

२.ई - निविदा क्रमांक ८१९५७६सन २०२२-२३

३.निविदा विक्री कालावधी:- दि.२०/०७/२०२२ ते दि.२७/०७/२०२२

४.निविदा स्विकारणेची दिनांक :- दि.२०/०७/२०२२ ते दि.२७/०७/२०२२

५.निविदा उघडणेचा दिनांक :- दि.२९/०७/२०२२

६.कामाची मुदत :- १२ महिने

७. प्राप्त झालेल्या निविदेचा तपशिल :- दि.०२/०८/२०२२ रोजीच्या मा.छाननीनुसार

| ई - निविदा क्रमांक | कामाचे नांव | निविदा रक्कम | निविदा दाखल करणारे ठेकेदार | निविदेमध्ये भरलेला दर(निविदा दरापेक्षा) | सर्वात कमी दराचे निविदाधारक व त्यांचा दर |
|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ |
| ई निविदा क्र. ८१९५७६ सन २०२२-२०२३ | अहमदनगर महानगरपालिका करीता अहमदनगर महानगरपालिका हद्दतील गटर /ड्रेनेज/चेंबर दुरूस्ती कामाकरीता वार्षिक निविदा मंजुरी (प्रभाग समिती क्र.२ करीता ) | १२,५०,००० | निकेतन शिवाजी लोटके | निविदा दरापेक्षा ३.००% कमी दराने | निकेतन शिवाजी लोटके<br><br>निविदा दरापेक्षा ३.००% कमी दराने |

वरील तुलनात्मक तक्त्याच्या अनुषंगाने स्पर्धात्मकदृष्या रकाना क्र.२ मध्ये नमुद निविदाधारक निकेतन शिवाजी लोटके.अ.नगर यांची निविदा निविदा दरापेक्षा ३% कमी दराने आलेली असून ती सर्वात कमी दराची आहे.सार्व.बांधकाम विभाग,शासन परिपत्रक क्रमांक सीएटी/२०१७/प्र.क्र.०८/इमा-२ दि.२६ नोव्हेंबर २०१८ नुसार निविदा किंमतीच्या १% ते १०% मी दरापर्यत १% प्रमाणे (Additional Performance Security Deposit) डी.डी.सादर करणे अनिवार्य आहे.त्या प्रमाणे यांनी पावती क्र.---- दि /०८/२२ अन्वये Additional Performance Security Deposit भरले आहे.

तरी उक्त बाब विचारात घेवून निविदाधारक निकेतन शिवाजी लोटके अ.नगर यांची निविदा निविदा दरापेक्षा ३% कमी दराने मंजुरीस्तव सविनय सादर.तसेच मा.स्थायी समितीकडे पाठविणेस सादर.

येणे प्रमाणे उप अभियांता यांचा अहवाल असे.

यावर मा.शहर अभियंता यांचा अभिप्राय की,वरील अहवालानुसार निविदा दरापेक्षा ३.००% कमी दराची निविदा स्वीकारणेस हरकत नाही.आदेशार्थ सादर.

यावर मुख्यलेखाधिकारी यांची स्वाक्षरी.

यावर मा.मुख्यलेखापरिक्षक यांचा अभिप्राय की,विभागाने प्रस्तावित केलेप्रमाणे "अ" नुसार कार्यवाहीस्तव सादर.

यावर मा.सहाय्यक आयुक्त यांचा अभिप्राय की, "अ" प्रमाणे मान्यतेस सादर..

यावर मा.उपायुक्त (सा) यांचा अभिप्राय की,प्रस्तावित"अ" "ब" "क" "ड" व "इ" मधील अभिप्रायानुसार निर्णयासाठी मा.स्थायी समितीसमोर ठेवण्यास आदेशार्थ सादर.

यावर मा.आयुक्त साहेब यांची सहमतीदर्शक स्वाक्षरी.

सबब प्रकरण मा.स्थायी समिती सभेपुढे सादर.

--**--

**चर्चा :-**

मा.सभापती साहेब :- अहमदनगर महानगरपालिका फेर ई नि.क्र.८१९५७६ अहमदनगर महानगरपालिका सन २०२२-२३ करीता अहमदनगर महानगरपालिका हद्दीतील गटर/ड्रेनेज/चेंबर दुरूस्ती कामाकरीता वार्षिक निविदा मंजुरी बाबत ऑफिस रिपोर्ट.(प्रभाग समिती क्र.२ करिता)

मा.श्री.परशराम गायकवाडः- ऑफिस रिपोर्ट वाचून दाखवा.

त्यानुसार सभेमध्ये ऑफिस रिपोर्टचे सभेमध्ये वाचन करण्यात आले.

मा.श्री.समद खान :- ऑफिस रिपोर्ट मंजुर करण्यात यावा.

मा.सौ.मिना चव्हाण :- ऑफिस रिपोर्ट मंजुर करण्यात यावा.

मा.सभापती साहेब :- अहमदनगर महानगरपालिका फेर ई नि.क्र.८१९५७६ अहमदनगर महानगरपालिका सन २०२२-२३ करीता अहमदनगर महानगरपालिका हद्दीतील गटर/ड्रेनेज/चेंबर दुरूस्ती कामाकरीता वार्षिक निविदा (प्रभाग समिती क्र.२ करिता) निविदाधारक निकेतन शिवाजी लोटके.अ.नगर यांची निविदा निविदा दरापेक्षा ३% सर्वात कमी दराच्या निविदेस मान्यता देण्यात येत आहे.

**<u>ठराव :-</u>** ऑफिस रिपोर्ट नुसार अहमदनगर महानगरपालिका फेर ई नि.क्र.८१९५७६ अहमदनगर महानगरपालिका सन २०२२-२३ करीता अहमदनगर महानगरपालिका हद्दीतील गटर/ड्रेनेज/चेंबर दुरूस्ती कामाकरीता वार्षिक निविदा (प्रभाग समिती क्र.२ करिता) निविदाधारक निकेतन शिवाजी लोटके.अ.नगर यांची निविदा निविदा दरापेक्षा ३% सर्वात कमी दराच्या निविदेस मान्यता देण्यात येत आहे.ऑफिस रिपोर्ट मंजुर.खर्च मंजुर.

कायदेशीर व नियमानुसार पुढील कार्यवाही करण्यात यावी.

सुचक :- मा.श्री.समद खान सही/-

अनुमोदक :- मा.सौ.मिना चव्हाण सही/-

ठराव सर्वानुमते मंजुर.

सही/-
सभापती
स्थायी समिती
अहमदनगर महानगरपलिका

**अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर**
**मा.स्थायी समिती सभा क्रमांक : ०९**

**विषय क्रमांक : १०४** **दिनांक :- २७/०९/२०२२**

---

**प्रस्तावाचा विषय :-** अहमदनगर महानगपालिकेच्या शहर पाणी पुरवठा योजनेसह वितरण व्यवस्थेकरिता तांत्रिक / अतांत्रिक कर्मचा-यांसह अभियंते उपलब्ध करणे कामी खाजगी एजन्सी मे.जेट सर्व्हिसेस,पुणे यांचे कामाची मुदत संपत असल्याने पुनश्च एजन्सी नेमणे कामी ई - निविदा प्रसिध्द करणे बाबत ऑफिस रिपोर्ट.

**प्रस्तावाचा मजकुरः-** अहमदनगर महानगरपालिका पाणी पुरवठा विभाग

विषयांकीत बाबत विनंती रिपोर्ट सादर की, अहमदनगर महानगरपालिकेच्या शहर पाणी पुरवठा योजनेसह वितरण व्यवस्थेकरिता कार्यरत असलेल्या तांत्रिक / अतांत्रिक कर्मचारी वर्ग मोठया संख्येने कमी झालेले आहेत.त्याचा परिणाम शहराच्या दैनंदीन पाणी वितरणावर विपरीत परिणाम होत आहे.व कर्मचा-यांअभावी वितरण व्यवस्थेची व दुरूस्ती कामाची अत्यंत गंभीर समस्या निर्माण झालेली आहे.

त्यासाठी शहर पाणी पुरवठा योजनेसह सर्व प्रभागा करिता खालील प्रमाणे तांत्रिक/अतांत्रिक कर्मचारी कंत्राटी स्वरूपात उपलब्ध करणे कामी खाजगी एजन्सीची नेमणूक करणे मागील वर्षी जाहिर निविदा प्रक्रिया राबवून कामी मा.स्थायी समिती सभा क्र.०६ विषय क्र.७३ दिनांक ०३/०९/२०२१ अन्वये मंजुर ठरावानुसार मे.जेट सर्व्हिसेस ,पुणे या खाजगी एजन्सीची इकडील जा.क्र.शहर पा.पु.८०६ दि.०७/१०/२०२१ अन्वये एक वर्ष मुदती करिता नेमणूक करण्यात आलेली आहे.ही नेमणूक दि.०६/१०/२०२२ अखेर संपुष्टात येणार आहे.तद्नंतसाठी एजन्सीची नेमणूक करणे कामी ई - निविदा पध्दत अवलंबून कार्यवाही करावी लागेल.

तसेच सद्यस्थितीत मे.जेट सर्व्हिसेस,पुणे यांचे कडून वरील नमुद प्रमाणे खाजगी तत्वावर कर्मचारी उपलब्ध करून घेतल्यानंतर त्यांना दरमहा बिले अदा करण्यात येतात.सदरची देयके ही १५ वा वित्त आयोगातील उपलब्ध तरतूद रक्कम रू.१.६० कोटी मधून करण्यात येत आहेत.सद्यस्थितीत या लेखाशिर्षकात रू.२०,९१,३२७/- इतकीच रक्क्म शिल्लक असून या ठेकेदारास माहे जुलै,ऑगस्ट,सप्टेंबर व ऑक्टोबर २०२२ अखेर केलेल्या वाढीव तरतूद करणे अनिवार्य आहे.

तसेच सदरहू एजन्सी मे.जेट सर्व्हिसेस,पुणे यांची एक वर्षाची नेमणूक दि.०६/१०/२०२२ अखेर संपुष्टात येणार असल्याने तत्पुर्वी नव्याने निविदा प्रक्रिया राबविणे व नवीन निविदा प्रक्रिया कार्यवाही अंतिम सदरहू संस्थेस मुदतवाढ देणे गरजेचे व आवश्यक आहे.

यास्तव विषयांकीत कामी खालील प्रमाणे कार्यवाही करणे अत्यंत गरजेचे व आवश्यक आहे.

१.विषयांकीत कामी विभागाच्या आवश्यकते नुसार मे.जेट सर्व्हिसेस,पुणे यांचे कडून कर्मचारी उपलब्ध करून घेणे पोटी त्यांचे माहे जुलै,ऑगस्ट,सष्टेंबर व ऑक्टोबर २०२२ या चार महिन्यांचे देयक अदा करणे करिता लेखा विभागा मार्फत वाढीव बजेट तरतुद करणेस

२.विषयांकीत कामी मे.जेट सर्व्हिसेस,पुणे यांची एक वर्ष कालावधीची दि.०६/१०/२०२२ अखेर संपुष्टात येणार असल्याने तत्पुर्वी नव्याने निविदा प्रक्रिया राबविणेस.

३.विषयांकीत कामी नवीन निविदा प्रक्रिया कार्यवाही अंतिम होईपर्यत मे.जेट सर्व्हिसेस,पुणे या संस्थेस मुदतवाढ देणे संयेक्तीक राहील.असे इकडील मत आहे.

करिता ऑफिस रिपोर्ट मंजुरीस्तव सविनय सादर.

येणे प्रमाणे पाणी पुरवठा लिपीक यांचा अहवाल असे.

यावर मा.उप-अभियंता यांचा अभिप्राय की,मंजूरीस्तव सविनय सादर.
यावर मा.जल अभियंता यांचा अभिप्राय की,अहवालानुसार मान्यतेस्तव सादर.
यावर मुख्यलेखाधिकारी यांचा अभिप्राय की,- वेळेत निविदा प्रक्रिया राबविणे आवश्यक आहे.
- प्रस्तावित मान्यतेस सादर.

यावर मुख्यलेखापरिक्षक यांचा अभिप्राय की,जल अभियंता यांनी प्रस्तावित केलेप्रमाणे "अ" नुसार कार्यवाहीस्तव सादर.

यावर मा.उपायुक्त (कर) यांचा अभिप्राय की,- १५ वा.वित्त आयोग बंधनकारक २५% मधून प्रस्तावित करणेस
- नव्याने ई - निविदा प्रक्रिया करणेस व तोपर्यत जेट सर्व्हिसेस यांना मुदतवाढ प्रस्ताव मान्य करणेस सादर.

यावर मा.आयुक्त साहेब यांचा अभिप्राय की,प्रस्तावित मान्य.मा.स्थायी समितीच्या मान्यतेस अधिन राहून माहे.जुलै चे बील अदा करावे.

सबब प्रकरण मा.स्थायी समिती सभेपुढे सादर.

--**--

**चर्चा :-**

मा.सभापती साहेब :- अहमदनगर महानगपालिकेच्या शहर पाणी पुरवठा योजनेसह वितरण व्यवस्थेकरिता तांत्रिक / अतांत्रिक कर्मचा-यांसह अभियंते उपलब्ध करणे कामी खाजगी एजन्सी मे.जेट सर्व्हिसेस,पुणे यांचे कामाची मुदत संपत असल्याने पुनश्च एजन्सी नेमणे कामी ई - निविदा प्रसिध्द करणे बाबत ऑफिस रिपोर्ट आहे.

मा.सभापती साहेब :- विषया बाबत सविस्तर माहिती देण्यात यावी.

जल अभियंता श्री.निकम :- महानगरपालिका हद्दीमध्ये पाणी पुरवठा वितरणासह तांत्रिक अतांत्रिक कर्मचारी अभियंते मागणी प्रमाणे उपलब्ध करून देणे बाबत खाजगी एजन्सी जेट एजन्सी यांना दि.७/१/२०२१ रोजी कामाचे आदेश देण्यात आलेले होते.एक वर्षाची मुदत होती.त्यांची मुदत दि.६/१०/२२ रोजी संपणार असल्यामुळे पुढील कामा करीता एजन्सी नेमणे आवश्यक आहे.नविन एजन्सी नियुक्ती होत नाही तो पर्यत आहे त्याच एजन्सीला काम करावे लागणार आहे.सदरची एजन्सी आवश्यकतेनुसार अभियंते,वॉलमन,बिगारी ,पंपऑपरेटर पुरवठा करतात.

मा.श्री.सचिन शिंदे :- ऑफिस रिपोर्ट मंजुर करण्यात यावा.

मा.श्री.परशराम गायकवाड :- ऑफिस रिपोर्ट मंजुर करण्यात यावा.

मा.सभापती साहेब :- मे.जेट सर्व्हिसेस,पुणे यांचे कडून कर्मचारी उपलब्ध करून घेणे पोटी त्यांचे माहे जुलै,ऑगस्ट,सप्टेंबर व ऑक्टोबर २०२२ या चार महिन्यांचे देयक अदा करणे करिता लेखा विभागा मार्फत वाढीव बजेट तरतुद करणेस, मे.जेट सर्व्हिसेस,पुणे यांची एक वर्ष कालावधीची दि.०६/१०/२०२२ अखेर संपुष्टात येणार असल्याने तत्पुर्वी नव्याने निविदा प्रक्रिया राबविणेस. तसेच विषयांकीत कामी नवीन निविदा प्रक्रिया कार्यवाही अंतिम होईपर्यत मे.जेट सर्व्हिसेस,पुणे या संस्थेस मुदतवाढ देण्यास मान्यता देण्यात येत आहे.ऑफिस रिपोर्ट मंजुर.

**<u>ठराव :-</u>** मे.जेट सर्व्हिसेस,पुणे यांचे कडून कर्मचारी उपलब्ध करून घेणे पोटी त्यांचे माहे जुलै,ऑगस्ट,सप्टेंबर व ऑक्टोबर २०२२ या चार महिन्यांचे देयक अदा करणे करिता लेखा विभागा मार्फत वाढीव बजेट तरतुद करणेस, मे.जेट सर्व्हिसेस,पुणे यांची एक वर्ष कालावधीची दि.०६/१०/२०२२ अखेर संपुष्टात येणार असल्याने तत्पुर्वी नव्याने निविदा प्रक्रिया राबविणेस. तसेच विषयांकीत कामी नवीन निविदा प्रक्रिया कार्यवाही अंतिम होईपर्यत मे.जेट सर्व्हिसेस,पुणे या संस्थेस मुदतवाढ देण्यास मान्यता देण्यात येत आहे.ऑफिस रिपोर्ट मंजुर.खर्च मंजुर.

कायदेशीर व नियमानुसार पुढील कार्यवाही करण्यात यावी.

सुचक :- मा.श्री.सचिन शिंदे सही/-

अनुमोदक :- मा.श्री.परशराम गायकवाड सही/-

ठराव सर्वानुमते मंजुर.

सही/-
सभापती
स्थायी समिती
अहमदनगर महानगरपालिका

## अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर
### मा.स्थायी समिती सभा क्रमांक : ०९

**विषय क्रमांक : १०५** **दिनांक :- २७/०९/२०२२**

---

**प्रस्तावाचा विषय :-** अर्जदार श्री.अशोक अंबादास गायकवाड, वसुली वॉर्ड क्र.३४ केडगांव उपविभाग कार्यालय ,मालमत्ता क्रमांकZ४३४११६९८७ यांना नळ कनेक्शन नसतांना आकारण्यात आलेली पाणीपट्टीची आकारणी निर्लेखित करणे बाबत ऑफिस रिपोर्ट.

**प्रस्तावाचा मजकुरः-** अहमदनगर महानगरपालिका केडगांव उपविभाग

उपरोक्त संदर्भिय विषयास अनुसरून विंनंती पुर्वक रिपोर्ट वॉर्ड क्र.३४ चे वसुली लिपिक यांजकडुन देण्यात येतो की,वॉर्ड क्र.३४मालमत्ता क्र.Z४३४११६९८७ जुना मालमत्ता क्र.२९ चे मालमत्ता धारक श्री.अशोक अंबादास गायकवाड(भो) रहाणार देवी परिसर केडगांव यांनी नळकनेक्शन नसताना पाणीपटटीची आकारणी झाले बाबत दिनांक ११/०३/२०१३ रोजी सामान्य प्रशासन विभाग येथे अर्ज दिला होता.परंतु सदरचा अर्ज हा सामान्य प्रशासन विभागाकडून केडगांव उपकार्यालयाकडे येणे क्रमप्राप्त होते.परंतु हा अर्ज या कार्यालयाला प्राप्त झाला नाही.यानंतर ही आम्ही सदर मालमत्ता धारक यांना कराची वसुल होणे करता मागणी बिल अदा करत होतो.सन २०२२-२०२३ साली या मालमत्तेची संपुर्ण कराची रक्कम १,३९,०९६ इतकी घरपट्टी व पाणीपट्टी सह झाली.या बिलामध्ये पाणीपट्टी रक्कम २४,०००/- एवढी आहे.

मा.आयुक्त साहेबांच्या आदेशान्वये १००% शास्ती माफीची सवलत दिनांक २७/०७/२०२२ ते ३१ ऑगस्ट २०२२ अखेर पर्यत देण्यात आलेली आहे.या सुटीच्या सवलतीच्या परिपत्रकामुळे संबंधीत मालमत्ता धारक उपकार्यालयात येवून माझी पाणीपट्टी कराची रक्कम कमी झालेली नाही.त्यामुळे मी शास्ती माफीपासून वंचीत राहील.हा माझ्यावर अन्याय होईल असे सांगितले तसेच त्यांनी या पुर्वी दिलेल्या अर्जाची छायांकीत प्रत ऑफिसला देवून गेले.मालमत्ता धारक यांनी दिलेल्या अर्जातील नमुद केलेल्या आशयानुसार खात्री करण्यासाठी सदरचा अर्ज हा केडगांव पाणी पुरवठा क्लार्क व हेडफिटर यांना देण्यात आला.या नंतर पाणीपुरवठा विभागाचे हेड फिटर यांनी पाणीपुरवठा विभागाचे वॉलमन व कर्मचारी घेवून प्रत्यक्ष दर्शी स्थळ पाहणी व खोदाई करून पाहिले असता तेथे या मालमत्तेवर कोणतेही नळ कनेक्शन आढळुन आले नाही.असा अहवाल इकडेस देण्यात आला.सदर मालमत्ताधारक यांचे मागणी बील पाहता पाणीपट्टीची आकारण ही सन २००५ पासून झालेली दिसून येते.सदरची पाणीपट्टीची नोंद संगणकावर चुकीच्या पध्दतीने झालेचे दिसुन येते. तरी सन २०२२ २०२३ अखेर पर्यत आकारण्यात आलेली पाणीपट्टी रू२७,०००/- कमी करण्याबाबत रिपोर्ट आदेशार्थ सविनय सादर.

येणे प्रमाणे विभाग प्रमुख ,केडगांव विभाग यांचा अहवाल असे.

यावर प्रभाग अधिकारी प्र.स.क्र.४ यांचा अभिप्राय की,वसुली लिपीक,विभाग प्रमुख यांनी यावर केलेल्या प्रस्तावानुसार आदेशार्थ सादर.

यावर मा.सहाय्यक मुल्य निर्धारण तथा कर संकलन अधिकारी यांचा अभिप्राय की,अर्जदार यांचे अर्जानुसार सन २०१३ या वर्षी सदरचा अर्ज केडगांव उपकार्यालयाकडे प्राप्त न झाल्याने कार्यवाही झालेली नाही.तसेच

मिळकत धारक यांचे अर्जानुसार म्यु.पल.फिटर यांचे समक्ष जागा पाहणी अहवालानुसार सदर मिळकतीमध्ये नळ कनेक्शन आढळून येत नसल्याने सदर मिळकतीची पाणीपट्टीची रक्कम २२,५००/- निर्लेखित करणे कामी मनपा अधि.१९४९ मधील कलम १५२ नुसार मा.स्थायी समिती कडे पाठविणे योग्य होईल.तथापी १००% शास्ती माफी मध्ये पाणीपट्टी रक्कम वगळुन उर्वरीत रक्कम भरून घेणे योग्य होईल तथापी आदेशार्थ सादर.

यावर मा.सहा.आयुक्त यांचा अभिप्राय की,अर्जदार यांचा अर्ज सन २०१३ या वर्षीचा असल्याने सन २०१३-१४ ते आजपर्यंत,पाणी पुरवठा फिटर यांचा स्थळ पाहणीनुसार नळ कनेक्शन नसल्याने सन २०१३-१४ पासुन पाणी पट्टी निर्लेखित करणे कामी मा.स्थायी समितीसमोर ठेवणेस आदेशार्थ सादर.

यावर मा.उपायुक्त (कर संकलन अधिकारी) यांचा अभिप्राय की,अर्जदार यांचा दि.११/३/२०१३ चा नळपट्टी रद्द करणेबाबतचा अर्ज ,पाणीपुरवठा फिटर यांचा दि.२७/८/२०२२ रोजीच्या स्थळ पाहणी अहवालानुसार व प्रस्तावित "अ " व " ब "नुसार पाणीपट्टी निर्लेखित करणेकामी मा.स्थायी समितीसमोर ठेवणेस आदशार्थ सादर.

यावर मा.आयुक्त साहेब यांचा अभिप्राय की,"अ" नुसार मान्य

सबब प्रकरण मा.स्थायी समिती सभेपुढे सादर.

--**--

**चर्चा :-**

मा.सभापती साहेब :- अर्जदार श्री.अशोक अंबादास गायकवाड, वसुली वॉर्ड क्र.३४ केडगांव उपविभाग कार्यालय ,मालमत्ता क्रमांकZ४३४११६९८७ यांना नळ कनेक्शन नसतांना आकारण्यात आलेली पाणीपट्टीची आकारणी निर्लेखित करणे बाबत ऑफिस रिपोर्ट आहे.

मा.श्री.रविंद्र बारस्कर :- ऑफिस रिपोर्ट वाचून दाखवा.

त्यानुसार सभेमध्ये ऑफिस रिपोर्टचे वाचन करण्यात आले.

मा.श्री.सचिन शिंदे :- ऑफिस रिपोर्ट मंजुर करण्यात यावा.

मा.श्री.परशराम गायकवाड :- ऑफिस रिपोर्ट मंजुर करण्यात यावा.

मा.सभापती साहेब :- अर्जदार श्री.अशोक अंबादास गायकवाड, वसुली वॉर्ड क्र.३४ केडगांव उपविभाग कार्यालय ,मालमत्ता क्रमांकZ४३४११६९८७ यांना नळ कनेक्शन नसतांना आकारण्यात आलेली पाणीपट्टीची आकारणी निर्लेखित करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

**ठराव :-** ऑफिस रिपोर्ट नुसार अर्जदार श्री.अशोक अंबादास गायकवाड, वसुली वॉर्ड क्र.३४ केडगांव उपविभाग कार्यालय ,मालमत्ता क्रमांकZ४३४११६९८७ यांना नळ कनेक्शन नसतांना आकारण्यात आलेली पाणीपट्टीची आकारणी निर्लेखित करण्यास मान्यता देण्यात येत आहे.ऑफिस रिपोर्ट मंजुर.

कायदेशीर व नियमानुसार पुढील कार्यवाही करण्यात यावी.

सुचक :- मा.श्री.सचिन शिंदे सही/-

अनुमोदक :- मा.श्री.परशराम गायकवाड सही/-

ठराव सर्वानुमते मंजुर.

सही/-

सभापती

स्थायी समिती

अहमदनगर महानगरपालिका

**अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर**
**मा.स्थायी समिती सभा क्रमांक : ०९**

**विषय क्रमांक : १०६** **दिनांक :- २७/०९/२०२२**

---

**प्रस्तावाचा विषय :-** अर्जदार श्री.विव्दान उत्तम भिंगारदिवे , वसुली वॉर्ड क्र.६४ सावेडी प्रभाग समिती क्र.१ ,मालमत्ता क्रमांकZ१६४०६८७२८ यांना मालमत्ता कराची गाळा ताब्यात देण्या अगोदरची आकारण्यात आलेली मालमत्ता कराची आकारणी निर्लेखित करणे बाबत ऑफिस रिपोर्ट.

**प्रस्तावाचा मजकुर:-** अहमदनगर महानगरपालिका सावेडी प्र.स.क्र.१

प्रभाग समिती क्र.१ वॉर्ड क्र.६४ चे वसुली मदतनीस यांज कडून विनंती रिपोर्ट देण्यात येतो की,सावित्रीबाई फुले व्यापारी संकुल फेज ०१ मधील गाळा क्र.२५ चे भाडेकरी श्री.विव्दान उत्तम भिंगारदिवे यांनी सदर गाळा दि.२६/१२/२००७रोजी ताब्यात घेतलेला असुन सदर गाळयाची मालमत्ता कराची गाळा ताब्यात घेतलेल्या तारखेपासुन आकारणी करून मालमत्ता देयक मिळणे बाबत दि.२४/०९/२०२१ रोजी अर्जाव्दारे मागणी केलेली आहे.

अर्जदार यांच्या अर्जा नुसार मनप अभिलेखाची पडताळणी केली असता सावित्रीबाई फुले व्यापारी संकुल फेज -१ मधील गाळा क्र.२५ श्री.विव्दान उत्तम भिंगारदिवे यांना सदर गाळा दि.२६/१२/२००७ रोजी ताब्यात देण्यात आलेला असून सदर गाळयाला पुर्वी पासून म्हणजे श्री.विव्दान उत्तम भिंगादिवे यांना गाळा ताब्यात देण्या अगोदर पासुन मालमत्ता कराचे देयक सुरू होते.व आज पर्यत तसेच सुरू असुन सन २०२१ -२०२२ अखेर ३,४२,८३७/- रूपये इतकी थकबाकी झालेली आढळून येते.

तरी सदर गाळा श्री.विव्दान उत्तम भिंगारदिवे यांना ताब्यात देण्या अगोदर महानगरपालिकेच्या ताब्यात असल्याने दि.२६/१२/२००७ पुर्वीचा मालमत्ता कर संपुर्ण कमी करून भाडेकरी श्री.विव्दान उत्तम भिंगारदिवे यांना दिलेल्या ताबे पावती नुसार मालमत्ता कराचे सुधारीत आकारणी करून दुरूस्त मालमत्ता देयक देणे तसेच सदर गाळयास भोगवटादार म्हणून नाव लावणेस सविनय अहवाल मान्यतेस सादर.

येणे प्रमाणे वसुली मदतनीस यांचा अहवाल असे.

यावर कर निरीक्षक यांचा अभिप्राय की,वसुली लिपीक यांनी सादर केलेल्या प्रस्तावानुसार मालमत्ता धारक श्री.विव्दान उत्तम भिंगारदिवे यांनी मनपा मालकीची मालमत्तेची दिनांक २६/१२/२००७ रोजी ताबा घेतला आहे.यापुर्वी सदर मालमत्ता मनपाच्या ताब्यात असल्याने यापुर्वीची मालमत्ता कराची थकबाकी महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ मधील कलम १५२ अन्वये निर्लेखित करणे उचित वाटते व दि.२६/१२/०७ पासुन नविन मालमत्ता धारक श्री.भिंगारदिवे यांना कर आकारणी करणे उचित वाटते तथापी आदेशार्थ सादर.

यावर प्रभाग अधिकारी यांचा अभिप्राय की,कर निरीक्षक यांचा अभिप्राय व मार्केट विभागाकडील ताबा पावती व पत्र व वसुली लिपीक यांच्या प्रस्तावानुसार दि.२६/१२/२००७ पासुन कर आकारणी करणे उचित वाटते.

यावर मा.सहा.मुल्य निर्धारण व संग्राहक यांचा अभिप्राय की,दि.२६/१२/२००७ पूर्वी सदरचा गाळा हा कोणास भाडयाने दिला होता का?या बाबत मार्केट विभागाचा लेखी अभिप्राय घ्यावा.

यावर प्रभाग अधिकारी यांचा अभिप्राय की,फेरसादर,मा.सहा.मुल्य निर्धारक व संग्राहक यांनी आदेशीत केल्याप्रमाणे मार्केट विभागाचा अभिप्राय की,पा.नं.टि.-९ वर जोडला आहे.

यावर मा.सहा.मुल्य निर्धारण व संग्राहक यांचा अभिप्राय की,मार्केट विभाग प्रमुख यांचे दि.१७/१२/२०२१ चे पत्रा नुसार गाळा नं.२५ महानगरपालिकेच्या ताब्यात होता.श्री.भिंगारदिवे यांना सदरचा गाळा नं.२५ हा मार्केट विभागाने दि.२६/१२/२००७ रोजी ताब्यात दिलेला आहे.तरी दि.२५/१२/२००७ पर्यतची शास्ती व थकबाकी

बाबत त्यावरील शास्ती कराधान नियम ५१ नुसार मा.आयुक्त यांना स्वेच्छा निर्णया नुसार पुर्णत:किंवा अंशत:माफ करता येईल.तसेच सन २५/१२/२००७ पर्यतची थकबाकी महानगरपालिका अधिनियमातील कलम १५२ नुसार निर्लेखित करणे साठी मा.स्थायी समिती कडे पाठविणे विषयी आदेशार्थ सादर.

यावर मा.उपायुक्त (कर) यांचा अभिप्राय की,"अ" प्रमाणे मान्यतेसाठी

यावर मा.आयुक्त साहेब यांचा अभिप्राय की,मुलेप/मुलेअ

यावर मुख्यलेखाधिकारी यांचा अभिप्राय की,अधिनियमातील तरतुदीनुसार कार्यवाही करणेस सादर.

यावर मा.मुख्यलेखापरिक्षक यांचा अभिप्राय की,१.प्रभाग अधिकारी क्र.१सावेडी यांचे जा.क्र.४९० दि.८/१२/२०२१ तसेच मार्केट विभाग प्रमुख यांचेकडील जा.क्र.१७२ दि.१७/१२/२०२१ चे पत्र पाहता सावित्रीबाई फुले व्यापारी संकुल फेज -१ गाळा क्रमांक २५ हा महानगरपालिकेच्या ताब्यात असल्याबाबत आणिी दि.२६/१२/२००७ रोजी मार्केट विभागाने भाडे कराराने विव्दान भिंगारदिवे यांना दिल्याचे दिसुन येते.सदर बाबतीत गाळा क्र.२५ हा दिनांक २६/१२/२००७ पुर्वी महानगरपालिकेच्या ताब्यात असल्याचे दिसुन येते.२.दिनांक २५/१२/२००७ अखेरपर्यंतचे सदर गाळयाची थकबाकी महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमात सुधारीत २०११ मधील कलम १५२ नुसार निर्लेखित करणे आवश्यक आहे.३.महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम सुधारित २०११ मधिल प्रकरण -८ कराधान नियम ५१ नुसार शास्ती माफ करणेचे मा.आयुक्त यांना स्वेच्छाधिकार आहे.

वरील बाबींचे अवलोकन करता सहाय्यम मुल्य निर्धारण व संग्राहक यांचे अभिप्राय"अ" प्रमाणे कार्यवाहीस्तव सादर.

यावर मा.आयुक्त साहेब यांचा अभिप्राय की,यथाप्रस्तावित.

सबब प्रकरण मा.स्थायी समिती सभेपुढे सादर.

--**--

**चर्चा :-**

मा.सभापती साहेब :- अर्जदार श्री.विव्दान उत्तम भिंगारदिवे , वसुली वॉर्ड क्र.६४ सावेडी प्रभाग समिती क्र.१ मालमत्ता क्रमांकz१६४०६८७२८ यांना मालमत्ता कराची गाळा ताब्यात देण्या अगोदरची आकारण्यात आलेली मालमत्ता कराची आकारणी निर्लेखित करणे बाबत ऑफिस रिपोर्ट.

मा.श्री.रविंद्र बारस्कर :- ऑफिस रिपोर्ट वाचून दाखवा.

त्यानुसार सभेमध्ये ऑफिस रिपोर्टचे वाचन करण्यात आले.

मा.श्री.सचिन शिंदे :- ऑफिस रिपोर्ट मंजुर करण्यात यावा.

मा.श्री.परशराम गायकवाड :- ऑफिस रिपोर्ट मंजुर करण्यात यावा.

मा.सभापती साहेब :- अर्जदार श्री.विव्दान उत्तम भिंगारदिवे , वसुली वॉर्ड क्र.६४ सावेडी प्रभाग समिती क्र.१ ,मालमत्ता क्रमांकz१६४०६८७२८ यांना मालमत्ता कराची गाळा ताब्यात देण्या अगोदरची आकारण्यात आलेली मालमत्ता कराची आकारणी निर्लेखित करणे बाबत ऑफिस रिपोर्ट.

**ठराव :-** ऑफिस रिपोर्ट नुसार अर्जदार श्री.विव्दान उत्तम भिंगारदिवे , वसुली वॉर्ड क्र.६४ सावेडी प्रभाग समिती क्र.१ मालमत्ता क्रमांकz१६४०६८७२८ यांना मालमत्ता कराची गाळा ताब्यात देण्या अगोदरची आकारण्यात आलेली मालमत्ता कराची आकारणी निर्लेखित करण्यास मान्यता देण्यात येत आहे.ऑफिस रिपोर्ट मंजुर.

कायदेशीर व नियमानुसार पुढील कार्यवाही करण्यात यावी.

सुचक :- मा.श्री.सचिन शिंदे सही/-

अनुमोदक :- मा.श्री.परशराम गायकवाड सही/-

ठराव सर्वानुमते मंजुर.

सही/-
सभापती
स्थायी समिती
अहमदनगर महानगरपालिका

अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर
**मा.स्थायी समिती सभा क्रमांक : ०९**

**विषय क्रमांक : १०७** **दिनांक :- २७/०९/२०२२**

---

**प्रस्तावाचा विषय :-** अर्जदार श्री. बाबु एकनाथ कांडेकर व संगीता बाबु कांडेकर , वसुली वॉर्ड क्र.५४ अनुक्रमांक ५९५ Z१५४०५६५८१ सावेडी प्रभाग समिती क्र. १,नळ जोड खंडीत केलेला असताना आकारलेली नळजोड पोटीची रक्कम व त्यावर आकारलेली शास्ती कराची रक्कम निर्लेखित करणेबाबतचा ऑफिस रिपोर्ट

**प्रस्तावाचा मजकुर:-** अहमदनगर महानगरपालिका सावेडी प्र.स.क्र.१

मालमत्ता कर वसुली वार्ड क्रमांक ५४ चे वसुली लिपिक श्री.एस.सी.तायडे यांजकडून विनंती रिपोर्ट देण्यात येतो की,मालमत्ता कर वसुली वार्ड क्र.५४ अ.नं.५९८ वर नोंदणी असलेल्या मालमत्तेचे मालमत्ता धारक श्री.बापु ए.कांडेकर ,संगिता बा.कांडेकर यांनी दिनांक ०३/०६/२०२२ रोजी अर्ज देवून त्यांच्या ५९८ या मालमत्तेतील नळजोड दिनंक १८/०२/२००८ रोजी बंद करणेबाबतचा अर्ज दिलेला असल्याने नळजोडांची नांदरद्द करून त्यावरील आकारणीची रक्कम रद्द करून देयक कायमस्वरूपी रद्द करणेबाबत व सदरील मोकळया भुखंडाचा वापर वाहनतळासाठी (पार्कींग) साठी होत असल्याने मालमत्ता कराची आकारणी रद्द करून देयक कायमस्वरूपी रद्द करणेबाबत विंनती अर्ज दाखल केलेला आहे.

अर्जदार यांच्या विनंती अर्जानुसार व त्यांनी दाखल केलेल्या पावत्यानुसार अर्जदार श्री.कांडेकर यांनी भुखंड क्रमांक ९५ मध्ये पाणीपुरवठा विभाग सामान्या पावती क्रमांक ०८६३५३ दि.२५/४/२००५ अन्वये १/२" नळजोउापोटी बांधकाम दराने १०८००(दहा हजार आठशे) रूपये अनामत रक्कम भरलेली असून पावती क्रमांक ०८६३५४ दि.२५/४/२००५ अन्वये नळजोडणी शुक्ल २०० रूपये व पावती क्रमांक ०८६३३४ दिनांक २५/४/२००५ अन्वये सेवा शुल्कापोटी ५०० रूपये भरून अधिकृत नळ जोड घेतलेला असल्याचे निदर्शनास येत आहे.अर्जदार यांचे बांधकाम पुर्ण झालेले असल्याने व अर्जदार यांना नळजोडाची आवश्यकता नसल्याने नळजोडापोटी थकबाकी असलेल्या ३२४००/-रूपये पाणीपट्टी कर पावत क्रमांक ३७०४२ दिनांक ५/२/२००८ अन्वये ३१मार्च २००८ अखेर भरून नळजोड बंद करणेबाबत व नळजोडापोटी भरलेली अनामत रक्कम १०८००/-परत मिळणेबाबत दिनांक १८/२/२००८ रोजी अर्ज दिलेला आहे.

अर्जदार यांच्या दिनांक १८/२/२००८ रोजीच्या अर्जानुसार जावक क्रमांक सावेडी पाणीपुरवठा विभाग कार्यालय ४३१ दिनांक २२/०८/२००८ अन्वये पाणीपुरवठा विभाग फिटर श्री.मनोज शिंदे यांनी नळजोड बंद करून नळजोड बंद केल्याबाबतचा अहवाल सादर केलेला असुन पाणीपुरवठा विभाग अथवा संगणक विभागाकडुन आजपर्यत नळ जोडाची नोंद रद्द केल्याचे आढळून येत नाही.

तसेच अनुक्रमांक ५९८ वरील न.र.यो.क्र.४ स.प्लॉ.नं.९५ या मोकळया भुखंडाचा वापर नोबल हॉस्पीटलच्या विनामुल्य पार्कीगसाठी होत असल्याचे समक्ष पाहणी वेळी आढळून येते.त्याप्रमाणे अर्जदार यांनी सदरच्या मालमत्तेचा वापर विनामुल्य वाहन तळासाठी होत असल्याचे छायाचित्र सादर केलेले असून सदरच्या मालमत्तेचा वापर हा विनामुल्य वाहनतळासाठीच होत असल्याचे सिध्द होत आहे.मालमत्ता धारक यांनी शेजारीच असलेल्या त्यांच्या हॉस्पीटल मालमत्तेचा इमारत वापर प्रमाणपत्र दाखला जा.क्र.टि.पी.२७१७दिनांक २४/९/२००८ अन्वये घेतलेला असुन इमारत वापर प्रमाणपत्र १२ क्रमांक ची अट हि भुखंड क्रमांक ९५ हा पुर्णपणे वाहन तळासाठीच वापरण्यात यावा.याबाबत आदेश दिलेला आहे.

तरी अर्जदार यांनी कार्यालयीन पध्दतीनुसार नळजोड बंद करणेबाबत नियमानुसार अर्ज दिलेला असुन पाणीपुरवठा फिटर यांनी पाणीपुरवठा उपविभाग कार्यालय जा.क्र.४३१ दि.२२/८/२००८ अन्वये नळजोड बंद

केलेबाबतचा अहवाल दिलेला असल्याने व नळजोड बंद केलेला असल्याने अर्जदार यांचेकडुन पाणीपट्टी कराची रक्कम वसुल करता येणार नाही.तसेच सदरच्या भुखंडाचा वापर विनामुल्य पार्कीगसाठी होत असल्याबाबत समक्ष पाहणी केली असता आढळुन आले व इमारत वापर प्रमाणपत्रात सदरील प्लॉट नं.९५चा वापर पार्किग साठी करण्यात याबाबत आदेश दिलेला असल्याने अनंक्रमांक ५९८(Z१५४०५६५८१) यावरील आकारणी कायमस्वरूपी रद्द करणेबाबत व सदरचे देयकावरील आकारलेल्या मालमत्ताकराचे व शास्तीकराचे वजाचे समायोजन करून देयक कायमस्वरूपी रद्द करणेबाबत अहवाल सविनय सादर.

येणे प्रमाणे वसुली लिपीक यांचा अहवाल असे.

यावर कर निरिक्षक यांचा अहवाल की,वसुली लिपीक यांनी सादर केलेल्या प्रस्तावानुसार मालमत्ता धारक श्री.बापु एकनाथ कांडेकर व सौ.संगिता बापु कांडेकर यांना अर्जा नुसार कागदपत्रांची तसेच मनपा अभिलेखाची पडताळणी केली असता असे दिसुन येते की,मालमत्ता धारक यांना दि.२५/०४/२००५ रोजी नियमानुसार नळजोड घेतला होता.परंतु नळाची आवश्यकता नसल्याने नळबंद करण्याकरीता दिनांक १८/२/२००८ रोजी अर्ज केला होता.सदर अर्जा नुसार मनप फिटर यांनी जा.क्र.४३१/२२/८/२००८ रोजी नळजोड बंद केला आहे.

तरी सन २००८-२००९ पासुन पाणीपट्टीची थकबाकी शास्तीसह कमी करणे उचित वाटते.त्याच प्रमाणे न.र.यो.क्र.४ फा.प्लॉ.१०९ पैकी प्लॉ.नं.९५ चा वापर प्रमाणपत्र क्र.२७/७ दि.२४/९/२००८ मध्ये आरक्षण क्र.१२ मध्ये फा.प्लॉ.९५चा वापर वाहन तळ करीता करावा असा आदेश दिल्याने भुखंडाची केलेली करआकारण महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ अनुसुची (ड) प्रकरण ८ कराधान नियम २०(१)(क)(ड) नुसार कमी करणे उचित वाटते तथापी आदेशार्थ सादर.

यावर मा.प्रभाग अधिकारी प्र.स.क्र.१ यांचा अभिप्राय की,कर निरीक्षक यांचा अभिप्राय तसेच मनपा फिटर यांनी दि.२२/८/०८ रोजी दिलेला अहवाल तसेच मोकळया भुखंडावर झालेली विना -- वाहनतळावर झालेली आकारणी रद्द करणे बाबत मा.स्थायी समिती मध्ये ठेवून निर्लेखित करणे उचित वाटते.तथापी आदेशार्थ यावर सहाय्यक कर निर्धारक व संग्राहक अधिकारी यांचा अभिप्राय की,नगररचनाकार यांचा अभिप्राय घेवून सादर करा.

यावर सहाय्यक संचालक नगररचना यांचा अभिप्राय की,विषयांकीत भुखंड हे मंजुर रेखांकनातील बिनशेती झ ाालेले भुखंड आहेत.ते नोबेल हॉस्पीटल साठीच्या पार्कीगसाठी सध्या वापरात आहेत.त्यामुळे सदर भुखंड खुल्या प्लॉटची कर आकारणी करणेस हरकत नाही.

यावर सहाय्यक कर निर्धारक व संग्राहक अधिकारी यांचा अभिप्राय की, मा.नगररचनाकार यांचे अभिप्रायानुसार सदर भुखंडावर खुल्या प्लॉटची कर आकारणी करणेस हरकत नाही.तसेच पाणीपुरवठा जा.क्र.४३१ दि.२२/८/२००८ नुसार सदर भुखंडा वरील १/२" नळ कनेक्शन बंद केलेले असल्याने सदर बीलावरील पाणीपट्टीची थकबाकीची रक्कम व त्यावरील शास्तीची रक्कम कमी करावी लागेल.महाराष्ट्र मनप अधि.प्रकरण -८ कराधान नियम ५१ नुसार मा.आयुक्त यांना आपल्या स्वेच्छानिर्णया नुसार ,नियम ४१ खालील शास्ती किंवा नियम ५० खर्चाच्या फी किंवा वसुलीचा खर्च पुर्णत: किंवा अंशत: माफ करता येईल.

तसेच सदर बीलावरती पाणीपट्टीची थकबाकीची रक्कम १,५८,७००/- रू.महाराष्ट्र मनपा अधिनियमातील कलम १५२ नुसार सदरची रक्कम निर्लेखित करणेसाठी मा.स्थायी समिती पुढे पाठविणे योग्य होईल.तथापी आदेशार्थ सादर.

यावर मा.सहाय्यक आयुक्त यांचा अभिप्राय की,स्थळ पाहणीनुसार तसेच विभागाने सादर केलेल्या प्रस्तावानुसार व नगररचनाकार यांच अभिप्रायानुसार खुला प्लॉट ची आकारणी करणेस व दि.२२/८/२००८ नुसार नळ कनेक्शन बंद असल्याने प्रस्तावित "अ" "ब" प्रमाणे सदरची रक्कम निर्लेखित करणेकामी मा.स्थायी समिती समोर ठेवणेस आदेशार्थ सादर.

यावर मा.उपायुक्त (कर संकलन अधिकारी) यांचा अभिप्राय की,कर निरीक्षक यांचा १४/०६/२०२२ चा पंचनामा ,वसुली लिपीक यांच्या अहवालानुसार अर्जदार यांचे मागणीनुसार तसेच नगररचनाकार यांच्या अभिप्रायानुसार खुल्या प्लॉट ची आकारणी करणेस व दि.२२/८/२००८ पासुन नळकनेक्शन बंद असलेने सदरची रक्कम निर्लेखित करणेकामी मा.स्थायी समिती समोर ठेवणेस आदशार्थ सादर.

यावर मा.आयुक्त साहेब यांचा अभिप्राय  की,चर्चा करा, "अ" प्रस्तावित फक्त नळकनेक्शनच्या मर्यादेत मान्य.(२) मालमत्ता करा बाबत स्वातंत्र्य संचिका तयार करावी.

सबब प्रकरण मा.स्थायी समिती सभेपुढे सादर.

--**--

**चर्चा :-**

मा.सभापती साहेब :- अर्जदार श्री. बाबु एकनाथ  कांडेकर व संगीता बाबु कांडेकर , वसुली वॉर्ड क्र.५४ अनुक्रमांक ५९५  Z१५४०५६५८१ सावेडी प्रभाग समिती क्र. १,नळ जोड खंडीत केलेला असताना आकारण्यात पाणीपट्टीची रक्कम निर्लेखित करणेबाबतचा ऑफिस रिपोर्ट.

मा.श्री.रविंद्र बारस्कर :- ऑफिस रिपोर्ट वाचून दाखवा.

त्यानुसार सभेमध्ये ऑफिस रिपोर्टचे वाचन करण्यात आले.

मा.श्री.सचिन शिंदे  :- ऑफिस रिपोर्ट मंजुर करण्यात यावा.

मा.श्री.परशराम गायकवाड :- ऑफिस रिपोर्ट मंजुर करण्यात यावा.

मा.सभापती साहेब :- अर्जदार श्री. बाबु एकनाथ  कांडेकर व संगीता बाबु कांडेकर , वसुली वॉर्ड क्र.५४ अनुक्रमांक ५९५ Z१५४०५६५८१ सावेडी प्रभाग समिती क्र. १,नळ जोड खंडीत केलेला असताना आकारण्यात पाणीपट्टीची रक्कम निर्लेखित करणेबाबतचा ऑफिस रिपोर्ट.

**ठराव :-** ऑफिस रिपोर्ट नुसार अर्जदार श्री. बाबु एकनाथ  कांडेकर व संगीता बाबु कांडेकर , वसुली वॉर्ड क्र.५४ अनुक्रमांक ५९५ Z१५४०५६५८१ सावेडी प्रभाग समिती क्र. १,नळ जोड खंडीत केलेला असताना आकारण्यात पाणीपट्टीची रक्कम निर्लेखित करण्यास मान्यता देण्यात येत आहे.ऑफिस रिपोर्ट मंजुर.

कायदेशीर व नियमानुसार पुढील कार्यवाही करण्यात यावी.

सुचक :- मा.श्री.सचिन शिंदे  सही/-

अनुमोदक :- मा.श्री.परशराम गायकवाड  सही/-

ठराव सर्वानुमते मंजुर.

सही/-
सभापती
स्थायी समिती
अहमदनगर महानगरपालिका